क्षेमेन्द्रकृत

# कविकण्ठाभरण

संपादक

प्रा० वामन केशव लेले एम. ए.

वाराणसी

क्षेमेन्द्रकृत

# कविकण्ठाभरण

[ प्रस्तावना, अनुवाद, संक्षिप्त विवरण व सूचि यांसह ]

संपादक

प्रा. वामन केशव लेले, एम्. ए.

भारतीय भाषा-विभाग, काशी हिन्दू विश्वविद्यालय,

वाराणसी

प्रथमावृत्ति १९६६ ]

[ मूल्य रु० १ = ५० पैसे

प्रकाशक :—

सौ. मालती वामन लेले,
घर नं० बी. २७/६५ सी,
दुर्गाकुण्ड, वाराणसी–५ ( उ० प्र० )

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक—
बाळकृष्ण शास्त्री
ज्योतिष प्रकाश [illegible],
कालभैरव मार्ग, वाराणसी–१

पंडितप्रवर प्राध्यापक मुकुन्दशास्त्री खिस्ते

यांस

अत्यादरपूर्वक अर्पण

# अनुक्रमणिका

[ आंकडे पृष्ठांचे समजावेत ]


| | | |
|---|---|---|
| प्रस्तावना ... ... ... ... | | ५–१९ |
| प्रस्तावनेंतील अंकांकित संदर्भांचीं स्पष्टीकरणें ... | | २०–२३ |
| प्रथमः सन्धिः—कवित्वप्राप्तीचे उपाय ... | | २४–३२ |
| मंगलाचरण ... | २४ | |
| ग्रंथप्रयोजन ... | २४ | |
| ग्रंथविषयाचे विभाग ... | २४ | |
| कवित्वप्राप्तीचा दिव्यप्रयत्न | २५–२८ | |
| कवित्वप्राप्तीचा पौरुष प्रयत्न | २८–३१ | |
| संक्षिप्त विवरण ... | ३२ | |
| द्वितीयः सन्धिः—कवीचा शिक्षणक्रम ... | | ३३–४४ |
| उपजीवी कवींचे प्रकार ... | ३३–३७ | |
| भाषाप्रभु कवीचा शिक्षणक्रम | ३७–४३ | |
| संक्षिप्त विवरण ... | ४३–४४ | |
| तृतीयः सन्धिः—काव्यगत चमत्कार ... | | ४५–५३ |
| चमत्काराचा महिमा ... | ४५–४७ | |
| चमत्काराचे दहा प्रकार ... | ४७–५२ | |
| संक्षिप्त विवरण ... | ५३ | |
| चतुर्थः सन्धिः—काव्याचे गुणदोष ... ... | | ५४–६१ |
| काव्यगुण ... | ५४–५६ | |
| काव्यदोष ... | ५६–५७ | |

काव्यप्रकार ... ५७–६०

संक्षिप्त विवरण ... ६१

**पञ्चमः सन्धिः—शास्त्रोपासना** ... ... ६२–७७

शास्त्रांचा नामनिर्देश ... ६२

शास्त्रांचें निरूपण ... ६३–७५

उपसंहार ... ७६–७७

संक्षिप्त विवरण ... ७७

**परिशिष्ट अ**—ग्रंथांतील कारिकांची अकारानुक्रमणिका ७८


---

## प्रमुख मुद्रणदोषांची दुरुस्ती

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२ | २६ | अन्यव्यतिरेकानें | अन्वयव्यतिरेकानें |
| २१ | १ | श्रीव्यासदासपराख्य | श्रीव्यासदासापराख्य |
| ४० | १९ | वैरमत्सरवजनम् | वैरमत्सरवर्जनम् । |
| ४१ | ११ | भंगिनिःसङ्गे | भंगिर्निःसङ्गे |
| ४५ | ४ | वस्तुशब्दाथसार्थे | वस्तुशब्दार्थसार्थे |

---

# क्षेमेन्द्रकृत कविकण्ठाभरण

## प्रस्तावना

### बहुप्रसू ग्रंथकार—

आपल्या ग्रंथकर्तृत्वानें संस्कृत साहित्यावर कायमचा ठसा उमटविणारा क्षेमेन्द्र नांवाचा एक उल्लेखनीय ग्रंथकार काश्मीरांत अकराव्या शतकांत होऊन गेला. त्याचें कर्तृत्व व व्यक्तित्व हीं दोन्ही असाधारण होतीं. त्याचें स्वकालीन समाजाचें निरीक्षण जितकें सूक्ष्म तितकेंच चौफेर व जितकें भेदक तितकेंच सहृदय होतें. त्याला नैसर्गिक उज्ज्वल प्रतिभा लाभली नव्हती. तरी त्यानें परिश्रमांनीं श्रीशारदेची उपासना करून कविसमेलनांत नामोल्लेख होण्याइतकी योग्यता[1] संपादिली होती. त्याचा ग्रंथरचनेचा उत्साह उदंड होता व परिश्रमांविषयींची निष्ठा अदम्य होती. आणि म्हणूनच त्यानें आपल्या हयातींत सुमारें चाळीस[2] लहानमोठे ग्रंथ लिहून संस्कृत साहित्यांत मानाचें स्थान मिळविलें. त्याची ग्रंथसंपदा केवळ संख्याबहुल नाहीं, ती विषयबहुलहि आहे. त्याची कमावलेली लेखणी काव्यशास्त्र, छंदःशास्त्र, रसपूर्ण लघुकाव्यें, महाकाव्यें, उपदेशपर काव्यें, सारांशकाव्यें, राजांचीं पद्यात्मक चरित्रें, कोश अशा विविध विषयांत मनसोक्तपणें विहरली. ह्याबाबतींत त्याची तुलना हेमचन्द्र व भोज या दोघांशींच होऊं शकते. अशा ह्या व्यासंगी व बहुप्रसू ग्रंथकाराच्या चरित्राचा थोडक्यांत परिचय करून घेऊं.

### क्षेमेन्द्राचें चरित्र—

बहुतेक संस्कृत ग्रंथकार स्वतःविषयीं फारसें लिहीत-बोलत नाहींत. क्षेमेन्द्रानें मात्र इतकें मौन पाळलेलें नाहीं. तो आपल्या अनेक[3]

ग्रंथांच्या अखेरीस स्वचरित्रपर माहिती देतो. तिचें संकलन केलें असतां असें लक्षांत येतें कीं, क्षेमेन्द्र हा प्रकाशेन्द्र नामक एका सधन ब्राह्मणाचा मुलगा होता. प्रकाशेन्द्र हा धार्मिक वृत्तीचा व दानशूर होता.[४] त्याच्या घरीं निरंतर यज्ञयाग चालत असत. त्यांत ब्राह्मणांना अग्रासन मिळत असे. सूर्यग्रहणादि[५] पर्वणीच्या प्रसंगीं तो लाखों रुपयांचें व कृष्णाजिन वगैरे वस्तूंचें ब्राह्मणांना दान करीत असे. तो कट्टर शैव असून त्यानें एक 'विचित्र' शिवालय बांधलें होतें व त्यांत मातृचक्राची प्रतिष्ठापना केली होती.[६] अशा श्रीमंत व उदार प्रकाशेन्द्राचा क्षेमेन्द्र हा पुत्र. क्षेमेन्द्राचा जन्म कधीं झाला त्याविषयीं निश्चित उल्लेख मिळत नाहींत. तथापि तो इ. स. ९९० ते १०१० च्या दरम्यान जन्मला असावा असें डॉ. सूर्यकान्त[७] मानतात, तर त्याचा जन्म इ. स. ९९० च्या सुमाराचा असला पाहिजे, असें डॉ. काणे[८] म्हणतात. त्याचें व्यासदास[९] हें दुसरें नांव असून त्याचें शिक्षण अनेक गुरूंच्या[१०] हाताखालीं झालें असावें असें वाटतें. आपल्या गंगक नामक उपाध्यायाचा उल्लेख तो स्वतःच औचित्यविचारचर्चेंत[११] करतो. साहित्याचें म्हणजे साहित्यशास्त्राचें शिक्षण आपण अभिनवगुप्तांच्या हाताखालीं घेतलें, असें तो अन्यत्र[१२] म्हणतो. कोणी सोमपाद नांवाचाहि त्याचा आणखी एक गुरु होता[१३]. त्याला चक्रपाल नांवाचा एक भाऊ[१४] होता असें डॉ. सूर्यकान्त म्हणतात. त्याचा मित्रपरिवारहि बराच मोठा होता. त्यानें अनेक ग्रंथांच्या[१५] शेवटीं केलेल्या उल्लेखांवरून असें दिसतें कीं, कोण्या रामयशस् नांवाच्या मित्राच्या प्रेरणेनें त्यानें बरेच ग्रंथ लिहिले. त्याचें राजदरबारीं येणें-जाणें होतें. रत्नसिंह नांवाच्या राजाचा पुत्र उदयसिंह हा तर क्षेमेन्द्राचा शिष्य[१६] होता. लक्ष्मणादित्य नांवाचा आणखी एक राजपुत्रहि त्याचा शिष्य असल्याचा उल्लेख आढळतो.[१७] क्षेमेन्द्राचे आपल्या शिष्यांशीं अत्यंत जिव्हाळ्याचे व मित्रत्वाचे संबंध दिसतात. तो आपल्या ग्रंथांतून शिष्यांचीं[१८] पद्यें निःसंकोचपणें उदाहरणादाखल उद्धृत करतो. क्षेमेन्द्राचा

मृत्युमन निश्चितपणें सांगतां येत नाहीं. त्याचें निधन इ. स. १०६६ नंतर झालें असावें असें डॉ. काणे[१९] मानतात, तर तें १०७० च्या आसपास झालें असावें, असें डॉ. सूर्यकान्त[२०] मानतात. मुळांत शैव असलेल्या क्षेमेन्द्राला सोमपादानें वैष्णवपंथाची दीक्षा दिली. क्षेमेन्द्र त्यानंतर आमरण वैष्णवच राहिला.

## क्षेमेन्द्राचें ग्रन्थकर्तृत्व—

वर म्हटलेंच आहे कीं, क्षेमेन्द्राच्या वाणी-लेखणीचा आंवाका खूप मोठा होता. संस्कृत साहित्याची अशी एकहि शाखा नाहीं कीं, जीवर क्षेमेन्द्राचा सराईत हात फिरला नाहीं. त्याचे अनेक ग्रंथ जरी प्रकाशित झाले असले व आणखी अनेक ग्रंथ हस्तलिखित स्वरूपांत उपलब्ध होत असले तरी त्यानें एकंदर किती ग्रंथ लिहिले, तें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. आजमितीस चौतीस ग्रंथ क्षेमेन्द्राच्या नांवावर दाखल केले गेले आहेत, असा निर्देश डॉ. सूर्यकान्त[२१] करतात. ह्या संख्येस सुभाषितरत्नभांडागारमूचे संपादक दुजोरा देतात.[२२] डॉ. दे[२३] क्षेमेन्द्राच्या सदतीस ग्रंथांची यादी पुरवितात, तर क्षेमेन्द्रानें भारतमञ्जरी व बृहत्कथामंजरी ह्यांखेरीज सुमारें चाळीस ग्रंथ लिहिले, असें डॉ. काणे[२४] म्हणतात. ह्या मतभेदांच्या गुंतागुंतींत फारसें लक्ष न घालतां डॉ. दे यांनीं दिलेली क्षेमेन्द्राच्या ग्रंथांची यादी ग्राह्य मानून चालावयास हरकत नाहीं. त्या यादीनुसार क्षेमेन्द्रानें खालील ग्रंथ लिहिले असें ठरतें.

१. अमृततरंग, २. औचित्यविचारचर्चा [रचना इ. स. १०६३ पूर्वी; औचित्य हें रससिद्ध काव्याचें जीवित होय ह्या नवसिद्धान्ताचें, स्वतःसकट तेहतीस कवींच्या एकशेंपांच उदाहरणांसह, अन्वयव्यतिरेकानें पांडित्यपूर्ण प्रतिपादन ], ३. अवसरसार, ४. कनकजानकी, ५. कलाविलास [ दहा सर्गांत रचिलेलें सुंदर, समाजस्थितिदर्शक, औपरोधिक काव्य ],

६. कविकंठाभरण [ प्रस्तुतचा ग्रंथ ], ७. कविकर्णिका [ काव्यालंकार, काव्यकलंक व काव्यविवेक यांचें विबुधप्रिय विवेचन करणारा ग्रंथ ][२५], ८. क्षेमेन्द्रप्रकाश, ९. चतुर्वर्गसंग्रह [ धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांचें व कामपुरुषार्थाचें विशेषतया सुंदर वर्णन करणारें काव्य ], १०. चारुचर्या [ पौराणिक उल्लेखांनीं व स्वरचित कथांनीं शंभर श्लोकांत राजनीति व कायदेकानू यांचें शिक्षण देणारें व द्याद्विवेद व जल्हण यांना ग्रंथरचनेची प्रेरणा देणारें काव्य ], ११. चित्रभारत नाटक, १२. दर्पदलन [ सात विचारांत विभागलेलें, 'दर्प' ह्या विषयाच्या सहा उगमस्थानांचें तात्त्विक व सोदाहरण वर्णन करणारें, उत्कृष्ट, औपरोधिक, उपदेशपर दीर्घ काव्य ], १३. दशवतारचरितकाव्य [ स्वाभाविक, प्रवाही व परिणत शैलींत विष्णूच्या दहा अवतारांचें वर्णन करणारें, बुद्धाला विष्णूचा अवतार म्हणून मान्यता देणारें व बौद्धांनीं व हिंदूंनीं झगडूं नये असा उपदेश करणारें १७५९ श्लोकांचें काव्य ], १४. देशोपदेश [ ८ उपदेशांत विभागलेलें, दुष्ट-कंजूष-प्रभृतींवर प्रखर टीका करणारें, सुरुवातीच्या काळांतील २९८ श्लोकांचें काव्य ], १५. दान-पारिजात, १६. नर्ममाला [ ३ परिहासांत विभागलेलें, सरकारी अधिकारी, वैद्य, जादूगार व विशेषें-करून 'कायस्थ' यांवर उपरोधप्रचुर टीका करणारें, देशोपदेशासारखें, ३०७ श्लोकांचें, करुणान्त काव्य ], १७. नीतिकल्पतरु [ व्यासरचित राजनीतिपर ग्रंथावरील टीका ], १८. पद्यकादंबरी, १९. पवनपंचाशिका, २०. बृहत्कथामंजरी [ रचनाकाल इ. स. १०३७; १९ लंबकांत विभक्त; गुणाढ्यकृत 'बृहत्कथा' ह्या पैशाची प्राकृतांतील सप्तलक्षात्मक ग्रंथाचा साडेसात हजार पद्यांत संस्कृतांत संक्षेप; वर्णनें सरस ], २१. बौद्धावदान-कल्पलता [ रचनाकाल इ. स. १०५२; रचना-१०७ पल्लवांत विभक्त; सर्व जातककथांचा संग्रह; काव्यदृष्ट्या व धर्मदृष्ट्या बौद्धांना उत्कृष्ट वाटणारें बुद्धचरित्रपर काव्य ], २२. भारतमंजरी [ सर्वाधिक प्रसिद्ध काव्य; रचनाकाल इ. स. १०३७, पद्यसंख्या १०६६५; मूळ भारत व

हरिवंश ह्यांसह संपूर्ण ग्रंथ; सारांश चांगला; याच काव्यामुळें त्यास कवीन्द्रता लाभली ], २३. मुक्तावलिकाव्य; २४. मुनिमतमीमांसा, २५. राजावलि वा नृपावलि [ काश्मीरस्थ राजांची चरित्रावलि ], २६. रामायणमंजरी [ वाल्मीकीच्या रामायणकथेचें, १९८ प्रसंग वर्णून, ६३९१ श्लोकांत सांगितलेलें सार. भाषा ओघवती व सुगम. मूळ रामायणीय कथेचें सौंदर्य टिकवलें आहे ], २७. ललितरत्नमाला, २८. लोकप्रकाश [ कोश; व्यावसायिक, राज्यकारभारविषयक शब्दांची स्पष्टीकरणासह माहिती. हा ग्रंथ क्षेमेंद्राचाच असें बुल्हर मानतात, तर तो त्याचा नव्हे असें कौल[२६] व बेबर[२७] मानतात ], २९. लावण्यवतीकाव्य, ३०. वात्स्यायन-सूत्रसार, ३१. विनयवल्ली; ३२. वेताल-पंचविंशति; ३३. व्यासाष्टक [ 'भुवनोपजीव्य' व्यासांच्या स्तुतिपर आठ श्लोक; कदाचित् भारत-मंजरीच्याच अखेरच्या श्लोकांपैकीं आठ ], ३४. शशिवंश महाकाव्य; ३५. समयमातृका [ रचना इ. स. १०५०; दामोदरगुप्तांच्या कुट्टनीमताच्या धर्तीवर लिहिलेलें वेश्याव्यवसायावरील उपदेशपर काव्य; श्लोकसंख्या ६३५] ३६. सुवृत्ततिलक [ २७ वृत्तांचें, होतकरू कवींना मार्गदर्शन करण्यासाठीं, गुणदोषप्रदर्शनपूर्वक सोदाहरण विवेचन करणारा छंदःशास्त्रीय ग्रंथ ]; ३७. सेव्यसेवकोपदेश [ धनी व नोकर यांचीं कर्तव्यें वर्णन करणारें, सेव्यसेवकांमधील संबंध सुधारावेत ह्या इच्छेनें लिहिलेलें, ६१ श्लोकांचें 'सेवासार' ].

क्षेमेन्द्राच्या ह्या अफाट ग्रंथरचनेकडे पाहून असें वाटूं लागतें कीं, 'व्यर्थ जाऊं नेदी एक क्षण' हें जणूं आपलें व्रतच त्यानें बनविलें असावें. शिवाय विविध विषयांवर लेखणी चालवण्याची त्याची आवडहि दिसून येते. त्याच्या कांहीं ग्रंथांच्या समाप्तिपर श्लोकांवरून असें निश्चित म्हणतां येतें कीं, त्यानें इ. स. १०३७ सालीं बृहत्कथामंजरी लिहून ग्रंथरचनेचा श्रीगणेशा गिरविला आणि इ. स. १०६६ सालीं दशावतार-चरित लिहून लेखणी खालीं ठेविली. मध्यंतरींच्या तीस वर्षांच्या काळांत

त्यानें भरदार साहित्यसेवा केली. क्षेमेन्द्राच्या एकूण ग्रंथरचनेचा थोडक्यांत परिचय करून घेतल्यावर आतां त्याच्या प्रस्तुत ग्रंथाकडे म्हणजे कविकण्ठाभरणाकडे वळावयास हरकत नाहीं.

## कविशिक्षापर ग्रंथ

संस्कृत साहित्यशास्त्रपर ग्रंथांचे अनेक प्रकार पडतात. साहित्यदर्पणासारखे कांहीं ग्रंथ नाटकासकट सर्व साहित्यशास्त्रीय विषय हाताळतात, तर इतर बरेचसे ग्रंथ आपलें विचारक्षेत्र नाटकाखेरीज इतर विषयांपुरतें मर्यादित ठेवतात. कांहीं ग्रंथांत केवळ नाट्यशास्त्र व रस यांचेंच विवेचन केलेलें असतें तर कांहींत फक्त अलंकारांचें निरूपण केलेलें आढळतें. ध्वन्यालोकासारख्या कांहीं ग्रंथांत स्वतंत्र सिद्धान्ताचें प्रतिपादन केलेलें असतें तर शब्दव्यापारविचारादि ग्रंथांत निव्वळ शब्दशक्तींचा परामर्श घेतलेला असतो. कांहीं ग्रंथ केवळ रसविमर्शाला वाहिलेले आहेत तर कांहींत नायकनायिकादींच्या भेदादींचें सोदाहरण वर्णन आढळतें. डॉ. काणे[२८] यांनीं परिगणित केलेल्या ह्या प्रकारांखेरीज आणखी एक प्रकार संभवतो व तो म्हणजे कविशिक्षापर ग्रंथांचा. ह्या प्रकारच्या ग्रंथांमधून होतकरू कवींना काव्यनिर्मितीस उपयुक्त अशा अनेक मार्मिक व व्यावहारिक सूचना दिलेल्या असतात. क्षेमेन्द्राचा प्रस्तुतचा ग्रंथ[२९] ह्या वर्गांत मोडत असल्यामुळें ह्या वर्गांतील इतर ग्रंथांची संक्षिप्त ओळख करून घेऊन मग क्षेमेन्द्राच्या प्रस्तुत ग्रंथाकडे वळूं.

## राजशेखर ते राघवचैतन्य

नैसर्गिक प्रतिभेची देणगी लाभलेली नसल्यास होतकरूनें व्युत्पत्ति कशी संपादावी, काव्यरचनेचा अभ्यास कसा करावा, अनलसपणें सरस्वतीची उपासना करून तिला कसें प्रसन्न करून घ्यावें, व्याकरण-न्याय-राजनीति-लोकव्यवहार इत्यादि विविध विषयांचें व काव्यांगांचें ज्ञान कसें संपादावें ह्या व ह्यासारख्या विषयांसंबंधींच्या कांहीं सूचना दंडी,

वामन, रुद्रट इत्यादि ग्रंथकारांनींहि आपापल्या ग्रंथांमधून केलेल्या आढळून येतात. तथापि, त्या तुरळक स्वरूपाच्या असल्यामुळें व त्यात्या ग्रंथकारांची, आपापले ग्रंथ लिहिण्यामागील भूमिका, वेगळी असल्यामुळें त्यांच्या ग्रंथांना कविशिक्षापर ग्रंथ म्हणतां येत नाहीं. ह्या दृष्टीनें पाहतां राजशेखरकृत काव्यमीमांसा हाच आद्य ( काळ इ. स. ९००-९२५ ) कविशिक्षापर ग्रंथ ठरतो. काव्यमीमांसा हा एक अपूर्व ग्रंथ आहे. ग्रंथकारानें संकलिपलेल्या अठरा अधिकरणांपैकीं एकच अधिकरण सांप्रत उपलब्ध आहे. पण त्याच्या अठरा अध्यायांत येऊन गेलेले विषय, त्यांची विविधता, अनेक मतमतांतरांचे उल्लेख, असंख्य उदाहरणें व जागोजागच्या चर्चा हें सारें पाहिलें कीं, मन थक्कच होऊन जातें. ह्या अठरा अध्यायांत राजशेखरानें, काव्यविद्येंत कोणकोणत्या शास्त्रांचा समावेश होतो, पौरुषेय व अपौरुषेय शास्त्रें कोणतीं, तीं काव्योपकारक कशीं ठरतात, काव्यपुरुषाची उत्पत्ति कशी झाली, प्रतिभेचें स्वरूप कसें असतें इत्यादि तात्त्विक मुद्यांशीं होतकरू कवीचा प्रथम परिचय करून दिला असून त्यानंतर व्युत्पत्ति व पाक म्हणजे काय, काव्यपाक कसा साधावा, पद-वाक्यविवेक कसा करावा, वाक्यांचे निरनिराळे प्रकार काव्यांत कसे गुंफावेत, पाठाची प्रतिष्ठा कशी राखावी, काव्याचे विषय कसे व कोठून निवडावेत, इतरांच्या काव्यांतून शब्द, अर्थ, समस्त कल्पना यांची चोरी कशी करावी, कवीनें कोणते संकेत पाळावेत, तसेंच दिनचर्या कशी ठेवावी इत्यादि अनेकानेक बाबींविषयीं अत्यंत तपशीलवार सूचना दिल्या आहेत. मात्र कवींसाठीं हा शिक्षणक्रम आंखतांना राजशेखराच्या डोळ्यांपुढें पोटासाठीं काव्यरचना-कौशल्य शिकूं इच्छिणारा सामान्य कवि नाहीं, तर प्रतिष्ठेसाठीं काव्यनिर्मिति-तंत्र शिकूं इच्छिणारा सधन व व्यावसायिक कवि आहे. खेरीज, राजशेखराचा ग्रंथ कितीहि तपशीलवार असला तरी त्याची मांडणी असावी तितकी व्यवस्थित व नेटकी नाहीं. राजशेखराच्या काव्यमीमांसेंतील हे दोन्ही दोष क्षेमेन्द्रानें आपल्या

कविकंठाभरणांत उतरूं न देण्याची दक्षता बाळगली. त्यामुळें त्याचा ग्रंथ होतकरू कवींचा आदर्श वाटाड्या ठरण्याच्या योग्यतेचा झाला आहे.

कविकंठाभरणाचीं वैशिष्ट्यें मागाहून विचारांत घेऊं. तूर्त क्षेमेन्द्रानें प्रस्तुत ग्रंथांत हाताळलेल्या विषयांची तोंडओळख करून घेऊं.

## कविकंठाभरण–सारांश

क्षेमेन्द्रानें प्रतिपाद्य विषय पांच अध्यायांत सांगून टाकला आहे. तो अध्यायांना संधि हें नांव देतो. कवि नसलेल्यानें कवि होण्यासाठीं कवित्वशक्ति कशी प्राप्त करून घ्यावी तें तो पहिल्या संधींत सांगतो. त्याच्या मतीं कवित्वप्राप्तीसाठीं दिव्य व पौरुष असे द्विविध उपाय कर्तव्य ठरतात. देवी सरस्वतीच्या क्रियामातृकेचा अथवा बीजमंत्राचा जप करणें हा दिव्य प्रयत्न होय. त्याचें स्पष्टीकरण झाल्यावर क्षेमेन्द्र अल्पप्रयत्नसाध्य, कृच्छ्रप्रयत्नसाध्य व असाध्य असे शिष्यांचे तीन वर्ग पाडतो व त्यानंतर प्रत्येक वर्गातील शिष्यांनीं काव्यनिर्मितीसाठीं कोणते प्रयत्न करावेत तें स्पष्टपणें, संक्षेपानें पण पूर्णपणें सांगतो. कोणताहि मुद्दा संदिग्ध ठेवणें हें त्याला ठाऊक नाहीं. कृच्छ्रप्रयत्नसाध्य कवीनें सुरुवाती-सुरुवातीला वाक्यार्थशून्य पदरचनाहि करून पाहावी ही सूचना करून लगेच तेथल्यातेथें तो अशा पदरचनेचें एक उदाहरण देऊन टाकतो. त्यानंतर द्वितीय संधींत तो कवींचे छायोपजीवी, पदकोपजीवी, पादोपजीवी, सकलोपजीवी, व भुवनोपजीव्य असे पंचप्रकार उदाहरणांसह स्पष्ट करून मग वाणीवर प्रभुत्व मिळविलेल्या कवीनें कसें राहावें, काय खावें-प्यावें, काय वाचावें, काय लिहावें, काय अवलोकावें तें 'शंभर' सूचना देऊन स्पष्ट करतो. पुढचा म्हणजे तृतीय संधि चमत्कारनिरूपणास वाहिलेला आहे. ज्याला काव्यांत चमत्कार निर्मितां येत नाहीं तो कवि नव्हे व ज्या काव्यांत चमत्कार नाहीं तें काव्य नव्हे,[३०] हा स्वतःला मान्य असलेला सिद्धान्त प्रथमतः अन्वयव्यतिरेकानें स्पष्ट करून मग,

विचार करावा न लागतां प्रतीत होणारा चमत्कार, विचार केल्यावरच प्रतीत होणारा चमत्कार, शब्दगत चमत्कार इत्यादि चमत्काराच्या दहा प्रकारांचें प्रथमतः निरूपण करून त्यानंतर तो त्या सर्वांचीं उदाहरणें देतो. अशा प्रकारें चमत्कृतींचें सार सांगून झाल्यावर चवथ्या संधींत तो शब्दनिर्दोषता, अर्थनिर्दोषता व रसनिर्दोषता हे तीन काव्यगुण, शब्दसदोषता, अर्थसदोषता व रससदोषता हे तीन काव्यदोष आणि सगुण, निर्गुण, सदोष, निर्दोष व सगुणदोष हे काव्याचे पांच संभाव्य प्रकार एवढ्या मुद्यांचें दृष्टान्तांसह विवेचन करतो. इतके परिश्रम होतकरूनें घेतले तरीहि त्याच्या काव्याला भारवत्ता प्राप्त होणार नाहीं ह्या जाणिवेनें क्षेमेन्द्र पांचव्या संधींत निरनिराळ्या शास्त्रांशीं होतकरूनें कसा परिचय करून घ्यावा त्याचें विवरण करतो. अर्थात्, तें करतांना उदाहरणें देण्यास तो विसरत नाहीं हें सांगावयास नकोच. अशा-प्रकारें मेहनत घेणाऱ्या होतकरूंना विद्वानांच्या मेळाव्यांत आत्मविश्वासानें व स्वच्छंदपणानें वावरतां येवो आणि आपण कमावलेलें शुभफल ( पुण्य ) त्यांना लाभो अशी सदिच्छा विनीतभावानें व्यक्त करून क्षेमेन्द्र आपल्या कविकंठाभरणाचा समारोप करतो. ह्या ग्रंथाच्या रचनेच्या बाबतींत क्षेमेन्द्र जरी राजशेखराचा ऋणी असला तरी त्याची स्वतःची बुद्धि ग्रंथांत अवश्य चमकते.

**कविताशास्त्र**—क्षेमेन्द्रानंतर अरिसिंह व अमरचन्द्र या दोघां जैन शास्त्रकारांनी मिळून कवितारहस्य अथवा काव्यकल्पलता नामक ग्रंथ तेराव्या शतकांत लिहिला. ह्या ग्रंथाचे ( अ ) छंदःसिद्धि, ( ब ) शब्द-सिद्धि, ( क ) श्लेषसिद्धि व ( ड ) अर्थसिद्धि असे चार प्रतान आहेत. छंदःसिद्धि ह्या प्रतानांत अनुष्टुभ् वृत्तांतली रचना, प्रमुख वृत्तें, पाद-पूरणार्थकांचा उपयोग करण्याच्या युक्त्या, सुभाषितें, प्रशस्तिपर श्लोक इत्यादींची रचना साधण्याचे उपाय, राजा, मंत्री, नद्या, समुद्र, पर्वत, उद्यानें इत्यादींचीं वर्णनें साधण्याची हातोटी, कवीनें पाळावयाचे संकेत

इत्यादि मुद्यांचें विवेचन आलें आहे. व्युत्पत्ति, समासांचे साधित अर्थ, अनुप्रासादींची योजना, शब्दाचें अर्थत्रय, इत्यादि बाबींचा विचार शब्दसिद्धींत करण्यांत आला असून श्लेषसिद्धि हा प्रतान श्लेषोपयोगी शब्द, श्लेषांचे विविध प्रकार, चित्रबंध इत्यादींच्या विवरणास वाहिलेला आहे. आणि शेवटच्या म्हणजे अर्थसिद्धि ह्या प्रतानांत उपमादि अलंकारांची योजना कशी करावी त्याचें दिग्दर्शन करून अखेरीस कांहीं प्रसिद्ध उपमानांची यादी दिली आहे.[३१] थोडक्यांत 'कवितारहस्य' कवितेचें तंत्र चांगल्या प्रकारें समजावून सांगतें.

कवितारहस्य इतका 'विबुधप्रिय' झाला कीं, केशवमिश्र व देवेश्वर ह्या दोघां शास्त्रकारांना आपले अनुक्रमें अलंकारशेखर व कविकल्पलता हे ग्रंथ त्याच धर्तीवर लिहिण्याचा मोह आवरला नाहीं. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात[३२] लिहिल्या गेलेल्या अलंकारशेखरांत जरी काव्यलक्षण, प्रतिभा, रीति, उक्ति, मुद्रा, शब्दशक्ति, काव्यदोष, अलंकार, नायक-नायिकाभेद इत्यादि प्रायः सर्व साहित्यशास्त्रीय विषयांचा विचार झालेला असला तरी तो होतकरू कवींना मदत व्हावी म्हणूनच झालेला आहे, ही बाब लक्षांत घेणें आवश्यक आहे. देवेश्वर केशवमिश्राइतकाहि बुद्धीचा स्वतंत्रपणा दाखवीत नाहीं. तो आपल्या कविकल्पलतेंत (१४व्या शतकाचा प्रारंभ[३३]) अमरचंद्र अरिसिंहांच्या उपरिनिर्दिष्ट ग्रंथांतील उतारेच्या उतारे उद्धृत करतो. अमरचंद्राच्या अगोदर होऊन गेलेल्या जयमंगलाची कविशिक्षा व अमरचंद्राच्या समकालीन विनयचंद्राचा कविशिक्षापर ग्रंथ ह्या दोन ग्रंथांविषयीं फारशी माहिती मिळत नाहीं.[३४] ह्या विषयावरील शेवटचे दोन उल्लेखनीय ग्रंथकार म्हणजे गंगादास व राघवचैतन्य हे होत. पैकीं गंगादासानें आपल्या 'कविशिक्षा' नामक ग्रंथांत छंदःकथन, सामान्यशब्द, गुण, रस, अलंकार, काव्यदोष व समस्यापूरण हे विषय निरुपिले आहेत.[३५] राघवचैतन्याच्या ग्रंथाचें नांव कविकल्पलता[३६] आहे. ह्यापलीकडे त्याची माहिती मिळत नाहीं. येथवर संस्कृतांतील

कविशिक्षापर ग्रंथांचा जो आढावा घेतला त्यावरून, काव्यमीमांसा व कविकंठाभरण हेच ह्या शास्त्रांतील महत्त्वाचे ग्रंथ होत, हें स्पष्ट होईल.

## कविकंठाभरणाचीं वैशिष्ट्यें—

वर म्हटलेंच आहे कीं, क्षेमेन्द्र प्रस्तुत ग्रंथाच्या बाबतींत राजशेखराचा बराच ऋणी आहे. काव्यमीमांसा व कविकंठाभरण ह्या दोन ग्रंथांत अनेक अंशीं साम्य आढळून येतें. उदाहरणार्थ, राजशेखर आपल्या काव्यमीमांसेंत पांचव्या अध्यायांत रचनाकवि, शब्दकवि, अलंकारकवि इत्यादि आठ प्रकार[३७] सांगतो. क्षेमेन्द्र आपल्या कविकंठाभरणांत तृतीय संधींत जे समस्तसूक्तव्यापी, शब्दगत, अलंकारगत इत्यादि दशविध चमत्कार सांगतो ते राजशेखराच्या वरील विवेचनावरूनच सुचलेले दिसतात. राजशेखर होतकरू कवींना द्वितीय अध्यायांत अनेक शास्त्रांचें आलोडन करण्याचा उपदेश करतो. क्षेमेन्द्रहि पंचम संधींत शास्त्रपरिचयाचा महिमा गाऊन तर्क, व्याकरण, ज्यौतिष इत्यादि अठ्ठावीस शास्त्रांच्या अध्ययनाचा आदेश देतो. काव्यमीमांसेंतील कविचर्यापर बारावा अध्याय आणि कविकंठाभरणांतील दुसऱ्या संधींतील 'शतशिक्षा' या दोहोंत केवळ विषयांचेंच नव्हे, तर कल्पनांचें व शब्दांचेंहि विलक्षण साम्य आढळून येतें. कविकंठाभरणाचा द्वितीय संधि व काव्यमीमांसेचा अकरावा अध्याय यांचा विषय एकच आहे. अशाप्रकारें कविकंठाभरण जरी काव्यमीमांसेच्या छायेखालीं वाढला असला तरी त्याला स्वतःचें स्वतंत्र असें व्यक्तित्व निश्चितपणें आहे. त्या स्वतंत्र व्यक्तित्वाच्याच पैलूंचें आतां दर्शन घेऊं.

( अ ) सुटसुटीतपणा हा क्षेमेन्द्राच्या सर्वच ग्रंथांचा प्रमुख गुण आहे. तो कविकंठाभरणांतहि आढळतो. क्षेमेन्द्रानें आपला प्रतिपाद्य विषय केवळ पांच संधींत सांगून संपविला आहे. ह्याबाबतींत राजशेखराहून क्षेमेन्द्र वेगळा उमटून पडतो. राजशेखराचा नैसर्गिक कल विस्ताराकडे आहे, त्याला वाग्विलास, चर्चा, मतांतरांचा परामर्श ह्या गोष्टींत अंमळ

अधिक स्वारस्य वाटतें. उलट, क्षेमेन्द्र स्वभावतःच संक्षेपप्रिय आहे आणि संक्षिप्तपणें, आटोपशीरपणें आपलीं मतें मांडणें हें त्याला चांगलें जमतेंहि.[३८]

(आ) क्षेमेन्द्र आपलीं मतें थोडक्यांत मांडत असला तरी तो विवेचनांत संदिग्धता न येऊं देण्याची पुरेपूर खबरदारी घेतो. वर्ण्य विषयाच्या व्यापविस्ताराचें त्याला परिपूर्ण ज्ञान असतें, म्हणूनच त्याचें विवेचन निःसंदिग्ध होऊं शकतें. ह्याबाबतींत त्याची तुलना उत्कृष्ट शिक्षकाशीं होऊं शकेल. ज्याप्रमाणें हाडाचा शिक्षक शिकवावयाच्या विषयाचें पूर्ण चिंतन करून मगच वर्गांत पाऊल टाकतो त्याप्रमाणें क्षेमेन्द्रहि हातीं घेतलेल्या विषयाचें सांगोपांग मनन करून मगच ग्रंथलेखनास सुरुवात करतो. त्यामुळें ग्रंथलेखनसमयीं समस्त ग्रंथाचा संपूर्ण आराखडा त्याच्या डोळ्यांसमोर असतो. उदाहरणार्थ, प्रस्तुत ग्रंथाच्या सुरुवातीलाच आपण ह्या ग्रंथांत, शिष्यांना उपदेश देण्याच्या व विद्वानांच्या ज्ञानांत भर घालण्याच्या हेतूनें, अकवीची कवित्वप्राप्ति इत्यादि पांच विषयांचें पांच[३९] संधींत विवरण करणार आहोंत, हें तो स्पष्ट करतो. त्यामुळें ग्रंथ वाचणारासहि ग्रंथाचें उद्दिष्ट व स्वरूप ह्या दोहोंविषयीं प्रारंभींच चांगली कल्पना येऊन जाते. एकदा ग्रंथस्वरूप निश्चित केल्यावर तो विषयविवेचनाकडे तत्काळ वळतो आणि त्याची विषयविवेचनाची पद्धतिहि अनुकरणीय आहे. क्षेमेन्द्रानें ग्रंथलेखनाची एक शिस्त अंगीं बाणवून घेतली आहे. ती प्रस्तुत ग्रंथांतहि दृग्गोचर होते. उदाहरणार्थ, दिव्य प्रयत्नाचें मोजक्या सात-आठ श्लोकांत वर्णन करून क्षेमेन्द्र लागलीच शिष्यांच्या वर्गीकरणाच्या मुद्याकडे वळतो. वर्गीकरण, विभाजन ही सर्वच संस्कृत साहित्यशास्त्रकारांची एक आवडीची बाब आहे. क्षेमेन्द्राला तर विभाजनाचा भलताच हव्यास. औचित्यविचारचर्चेंत ज्याप्रमाणें तो अठ्ठावीस औचित्य-उगमस्थानें सांगतो, त्याप्रमाणें येथें देखील शिष्यांचे प्रकार तीन, कवींचे प्रकार पांच, चमत्कारांचे विभाग

दहा, काव्याचे गुण व दोष प्रत्येकीं तीन-तीन, काव्याचे भेद पांच, शास्त्रांचे प्रभेद अठ्ठावीस, असे भरभर भेदोपभेद सांगत जातो. त्यामुळें ग्रंथांत एक प्रकारची व्यवस्था निर्माण होते. आदर्श अध्यापक ज्याप्रमाणें नियत वेळांत मोजके चार-पांच मुद्दे विवेचन-उदाहरणपूर्वक मांडून विद्यार्थ्यांच्या गळीं उतरवितो, त्याप्रमाणें क्षेमेन्द्रहि थोडक्यांत पण मुद्देसूदपणें विषयाची चर्चा करतो. ग्रंथगत विषय व्यवस्थितपणें व स्पष्टपणें मांडण्याची कोण ही दक्षता !

( इ ) क्षेमेन्द्राचें विवेचन स्पष्टपणें वाचकांस प्रतीत होण्यास आणखीहि एक कारण आहे. तें म्हणजे उदाहरणांची विपुलता. त्याच्या औचित्यविचारचर्चा, सुवृत्ततिलक व कविकंठाभरण ह्या तिन्ही शास्त्रीय ग्रंथांत त्याची एक विशेष प्रवृत्ति दिसून येते, ती ही कीं, वाचकांवर उदाहरणांची जणू वृष्टि करावयाची. औचित्यविचारचर्चेत त्यानें स्वतःसकट एकूण तेहतीस कवींचीं एकशें पांच पद्यें उदाहरणादाखल दिलीं आहेत. प्रस्तुत ग्रंथांतहि तो ह्या बाबतींत काटकसर करीत नाहीं. छापील वीस पृष्ठांच्या प्रस्तुत ग्रंथांत एकूण पंचवीस कवींचीं त्रेसष्ट पद्यें उदाहरणादाखल त्यानें उद्धृत केलीं आहेत. तो फक्त महत्त्वाच्याच मुद्यांचें उदाहरणद्वारें स्पष्टीकरण करतो अशांतला प्रकार नाहीं. मुद्दा लहान असो, मोठा असो, क्षुल्लक असो, महत्त्वाचा असो, क्षेमेन्द्र सरस उदाहरणपद्य दिल्यावांचून पुढें सरकणार नाहीं. वाचकांच्या कल्पनाशक्तीला यत्किंचितहि शिणविण्यास तो राजी नाहीं. उदाहरणांची त्यानें इतकी पराकाष्ठा केली आहे कीं, होतकरू कवीनें उमेदवारीच्या काळांत वाक्यार्थशून्य पदरचनाहि करून पाहावी असा मुद्दा मांडून क्षेमेन्द्र लगेच आनन्दसन्दोह[४०] इत्यादि पद्य रचून देतो. उदाहरणेंहि तो केवळ महाकवींचीं देतो असें नाहीं. तर कालिदास-श्रीहर्ष-राजशेखर इत्यादि सन्माननीय थोरांच्या पंगतीला तो चन्द्रक, चक्रपाल, मालवरुद्र इत्यादि अल्पप्रसिद्ध कवींनाहि आणून बसवतो. तात्पर्य, साहित्यविषयक

तत्त्वचर्चा उदाहरणांच्या द्वारें सुगम, सुबोध व रोचक कशी करावी त्याचें तंत्र क्षेमेन्द्रानें चांगलेंच आत्मसात् केलें आहे व त्याचा फायदा वाचकांना मिळाल्यावांचून राहात नाहीं.

( ई ) क्षेमेन्द्राच्या विवेचनांत नुसताच पारदर्शक स्पष्टपणा नाहीं. त्यांत सडेतोडपणाहि आहे. टीका करितांना तो कवीच्या प्रतिष्ठेचा बाऊ करून बसत नाहीं. औचित्यविचारचर्चेत तर त्यानें कालिदासादि प्रथित-यशांच्या काव्यपंक्ति उद्धृत करून, [ इतकेंच नव्हे तर स्वतःचींहि पद्यें उद्धृत करून ] त्यांतील औचित्यभंगाच्या दोषाबद्दल कठोरपणें टीका केली आहे. [ दुसऱ्यावर टीकाप्रहार करणें सोपें आहे व तें सगळेच शास्त्रज्ञ आनंदानें करतात ! पण स्वतःवर निर्दय पण रास्त टीका करणारा एखादाच मोकळ्या मनाचा टीकाकार आढळतो. ] प्रस्तुत ग्रंथांतहि त्याची ही निर्भय टीकावृत्ति अल्पप्रमाणांत पण स्पष्टपणें जाणवते. तो मालवरुद्राचें वेल्लत्पल्लव······[४१] इत्यादि पद्य उद्धृत करून त्यांत चमत्काराचा अभाव असल्याचें दाखवतो. तसेंच भट्टनारायणाच्या वेणीसंहारांतील एक गद्यखंड[४२] रसकालुष्याचा नमुना म्हणून निर्दिष्ट करण्यास तो डरत नाहीं. असाध्यशिष्याचें वर्णन करतांना तर त्याची वाणी भलतीच धारदार बनते. त्याच्या मतीं 'असाध्यशिष्य' हा स्वभावतः दगडासारखाच असतो, त्याला काव्यरसाचा पाझर कोठून फुटायला ? क्षेमेन्द्र, ह्या संदर्भात, गाढवाला शिकवलें तरीहि गातां येत नाहीं, आंधळ्याला सूर्य दाखवला तरी त्याला तो दिसत नाहीं, असे दृष्टान्त देऊन आपला मुद्दा तिखट भाषेंत मांडतो.

( उ ) संस्कृतांतील समस्त कविशिक्षापर ग्रंथांत प्रस्तुतचा क्षेमेन्द्र-कृत ग्रंथ आणखीहि एका कारणासाठीं वैशिष्टयपूर्ण आहे. तें कारण म्हणजे क्षेमेन्द्रानें चमत्काराचें केलेलें दशविध वर्गीकरण. चमत्काराचा उल्लेख व प्रयोग अनेक साहित्यविदांनीं केला पण त्याचें असें वर्गीकरण-पूर्वक सोदाहरण विवेचन एकट्या क्षेमेन्द्रानेंच केलेलें आढळतें. अर्थात्,

चमत्काराचा हा सूक्ष्म विचार ही खास क्षेमेन्द्राचीच वैचारिक देणगी होय.

एवंच, क्षेमेन्द्र जें व जितकें सांगावयास हवें तें व तितकें अवश्य सांगतो. त्यांत हातचा राखत नाहीं. जें कांहीं बोलतो तें पद्धतशीरपणें, थोडक्यांत, स्पष्टपणें व दाखले देऊन बोलतो. त्याच्या विवेचनांत कोठेंहि पुनरुक्ति नाहीं, पाल्हाळ नाहीं व त्यामुळेंच कंटाळवाणेंपणाहि नाहीं. समस्त विवेचनांत एक प्रकारचा कमावलेला सफाईदारपणा व नीटसपणा आहे. आणि म्हणूनच राजशेखराच्या काव्यमीमांसेपेक्षां क्षेमेन्द्राचा कविकंठाभरण हा ग्रंथच होतकरू कवींचा उत्कृष्ट मार्गदर्शक ठरण्याच्या योग्यतेचा आहे, असें वाटतें.[४३]

कविकंठाभरणासंबंधीं जें कांहीं सांगावयाचें होतें तें सांगून झालें. आतां प्रस्तुत पुस्तक प्रकाशित करण्यामागील भूमिकेसंबंधीं दोन शब्द सांगावयास हवेत. क्षेमेन्द्राच्या औचित्यविचारचर्चेचें अध्ययन करतांना प्रस्तुत ग्रंथाकडे लक्ष वेधलें गेलें. त्याच्या प्रथम वाचनाबरोबरच तो मनांत ठसला व त्याचा अनुवाद करण्याचा बेत पक्का झाला. लगेच अनुवादास सुरुवात केली व आज ह्या स्वरूपांत ग्रंथ वाचकांसमोर येत आहे. प्रस्तुत ग्रंथ सिद्ध करतांना माझे ज्येष्ठ स्नेही प्रा. डॉ. गजाननशास्त्री मुसळगांवकर ह्यांनीं चर्चेच्या व सूचनांच्या रूपानें मला जें प्रेमपूर्वक साह्य केलें त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

ग्रंथ वाचकांचे हातीं देत आहें. त्यांना जर तो 'उपादेय' वाटला तर त्याबद्दलचें सारें श्रेय क्षेमेन्द्राचें आहे, असें मी मानीन.

प्रस्तावनेंतील अंकांकित संदर्भांचीं स्पष्टीकरणें पुढील पानांवर दिलीं आहेत.

वाराणसी, २९ जुलै, १९६६.        वा. के. लेले

# प्रस्तावनेंतील अंकांकित संदर्भांचीं स्पष्टीकरणें

१. क्षेमेन्द्रनामा तनयस्तस्य विद्वत्सपर्यया ।
प्रयातः कविगोष्ठीषु नामग्रहणयोग्यताम् ।। श्लोक ७
भारतमंजरींतील हरिवंश समाप्तीनंतरचे श्लोक–भारतमंजरी, काव्यमाला नं. ६४, सन १८९८.

२. Dr. P. V. Kane–History of Sanskrit Poetics, 1961, p. 264

३. औचित्यविचारचर्चा, भारतमंजरी, दशावतारचरित, रामायणमंजरी इ. इ.

४. सदा दानार्द्रहस्तेन महता भद्रमूर्तिना ।
साधु कुंजरिता येन प्राप्ता कीर्तिपताकिना ।।—
रामायणमंजरी—समाप्तिश्लोक क्रमांक ४. रामायणमंजरी काव्यमाला ८३; इ. स. १९०३.

५. सूर्यग्रहे त्रिभिर्लक्षैर्दत्त्वा कृष्णाजिनत्रयम् ।—
बृहत्कथामंजरी–१९.३३.

६. यः श्रीस्वयंभूभवने विचित्रे लेप्यप्रतिष्ठापितमातृचक्रः ।
गोभूमिकृष्णाजिनवेश्मदाता तत्रैव काले तनुमुत्ससर्ज ।।—औचित्यविचारचर्चा–समाप्तिश्लोकांक १. औचित्यविचारचर्चा—हरिहर प्रकाशन, वाराणसी, सं० २०१७ वि०, पृ. ८८.

७. Kṣemendra Studies, Poona Oriental Series No 91, 1954, Chap. I, p. 7.

८. History of Sanskrit, Poetics, 1961, p. 266.

९. इति श्रीव्यासदासपराख्यक्षेमेन्द्रकृते कविकंठाभरणे कवित्वप्राप्तिः प्रथमः सन्धि : । इ. प्रत्येक सन्धीच्या अखेरीचे निर्देश.

१०. तस्यात्मजः सर्वमनीषिशिष्यः श्रीव्यासदासापरपुण्यनामा ।— औचित्यविचारचर्चा ( उपर्युल्लिखित प्रत ) समाप्तिश्लोकांक २, पृ. ८८.

११. यथा अस्मदुपाध्यायगङ्गकस्य ।—औचित्यविचारचर्चा—उपर्युल्लिखित प्रत, पृ. ८६.

१२. आचार्यशेखरमणेर्विद्याविवृतिकारिणः । श्रुत्वाभिनवगुप्ताख्यात्साहित्यं बोधवारिदेः ॥–भारतमंजरींतील हरिवंशसमाप्तीनंतरचा श्लोकांक ८. भारतमंजरी, काव्यमाला नं. ६४; इ. स. १८९८

१३. Kṣemendra Studies, Poona Oriental Series, No. 91, 1954, Chapt. I, p. 11.

१४. Kṣemendra Studies, Poona Oriental Series, No. 91, 1954, Chapt. I, p. 13.
परंतु, डॉ. सूर्यकान्तांचें हें म्हणणें युक्त नाहीं, कारण क्षेमेन्द्र 'यथा चैतद्भ्रातुश्चक्रपालस्य ।' ( कविकंठाभरण-द्वितीय संधि ) असें म्हणतो; 'अस्मद्भ्रातुः'—असें म्हणत नाहीं.

१५. भारतमंजरी, रामायणमंजरी, इ.

१६. अचेनत-चेतनाध्यारोपपरिचयो यथा मच्छिष्यमहाश्रीभट्टोदयसिंहस्य ललिताभिधाने महाकाव्ये—कविकंठाभरण, पञ्चमः सन्धिः ।

१७. विवेकपरिचयो यथा मच्छिष्यराजपुत्रलक्ष्मणादित्यस्य—कविकंठाभरण, पंचमः संधिः ।

१८. 'इह विकसदशोकाः'······'इ.इ. तसेंच 'आशापाश'···'इ. इ.— कविकंठाभरण, पंचमः संधिः ।

१९. History of Sanskrit Poetics, 1961, p. 266.

२०. Kṣemendra Studies, Poona Oriental Series No. 91, 1954, Chapt. I, p. 8.
२१. Kṣemendra Studies, Poona Oriental Series 91, 1954, Chapt. I, p. 28.
२२. सुभाषितरत्नभांडागारम् ( १९५२ ), Abbreviations & Sources—पृ. २.
२३. History of Sanskrit Poeties, (1960), Vol. I, p. 132-133.
२४. History of Sanskrit Poeties, 1961 p. 264.
२५. सुभाषितरत्नभांडागारम् ( १९५२ ), Abbreviations & Sources, पृ. 1.
२६. देशोपदेश व नर्ममाला, कश्मीर सीरीज्, १९२३, Introduction p. 25.
२७. Kṣemendra Studies, Poona Oriental Series No. 91, 1954, Chapt I p. 25.
२८. History of Sanskrit Poetics, 1961, p. 345-346.
२९. Edwin Gerow's Notes on p. 100 of S. K. De's Sanskrit Poetics as a Study of Aesthetic, 1963.
३०. नहि चमत्कारविरहितस्य कवेः कवित्वं, काव्यस्य वा काव्यत्वम् ।—कविकंठाभरण—तृतीयः सन्धिः ।
३१. Dr. S. K. De–History of Sanskrit Poetics ( 1960 ), Vol. I, p. 259.
३२. Dr. P. V. Kane—History of Sanskirt of Poetics ( 1961 ), p. 317.

३३. Dr. S. K. De–History of Sanskrit Poetics, 1960, Vol. I, p. 260.

३४. Dr. S. K. De–History of Sanskrit Poetics, 1960, Vol. I, p. 260 & 280.

३५. Dr. S. K. De–History of Sanskrit Poetics, 1960, Vol I, p. 260-261.

३६. Dr. S. K. De–History of Sanskrit Poetics, 1960, Vol. I, p. 295.

३७. काव्यमीमांसा, हरिदास संस्कृत ग्रन्थमाला १४, इ.स. १९५९, पृ० ८२.

३८. उदा०, मूळ गुणाढ्यकृत बृहत्कथेच्या सात लाख पद्यांचा बृहत्कथा-मंजरींत साडेसात हजार श्लोकांत संक्षेप; लक्षश्लोकी महाभारताचा भारतमंजरींत १०६६५ श्लोकांत संक्षेप; रामायणीय कथेचा रामायणमंजरींत ६३९१ श्लोकांत संक्षेप.

३९. कविकंठाभरण, प्रथम सन्धि, श्लोक ३ व ४.

४०. " " "

४१. " तृतीय संधि

४२. " चतुर्थ संधि—"भानुमत्या नकुलप्राशिस्वप्नदर्शने पाण्डवनकुलस्वैरसङ्गमेर्ष्यासद्भावश्चक्रवर्तिमहिष्याः सामान्यनीच-वनितावत् ॥"

४३. प्रस्तुत पुस्तकांत 'महाकविश्रीक्षेमेन्द्रविरचितं कविकण्ठाभरणम्', हरिदास संस्कृत सीरीज्, क्रमांक २४, बनारस, १९३३, ह्या संस्करणांतील पाठ प्रायः स्वीकारले आहेत.

# क्षेमेन्द्रकृत कविकण्ठाभरण

## प्रथमः सन्धिः ।

जयति जितसुधाम्भःसम्भवद्वाग्भवश्री-
रथ सरससमुद्यत्कामतत्त्वानुभावा ।
तदनु परमधामध्यानसंलब्धमोक्षा
रविशशिशिखिरूपा त्रैपुरी मन्त्रशक्तिः ॥ १ ॥

**भावार्थ**—अमृतजलापासून उद्भवणाऱ्या वागुत्पत्तीच्या ऐश्वर्यास जिंकणारी, त्यानंतर सरस व उत्पन्न होणाऱ्या कामतत्त्वाच्या प्रभावानें युक्त व तदनंतर परमोच्च तेजाच्या रूपानें ध्यान केलें असतां मोक्ष प्राप्त करून देणारी आणि सूर्य, चंद्र व अग्नि यांच्या स्वरूपाची त्रैपुरी ( म्हणजे त्रिपुरासंबद्ध ) मन्त्रशक्ति विजयी होते. ( या नमनांत ऐं क्लीं सौः ह्या त्रिपुरानामक मंत्राचा महिमा गायिला आहे. )

शिष्याणां उपदेशाय विशेषाय विपश्चिताम् ।
अयं सरस्वतीसारः क्षेमेन्द्रेण प्रदर्श्यते ॥ २ ॥

**भावार्थ**—शिष्यांना उपदेश देण्यासाठीं आणि विद्वानांना विशेष ज्ञान प्राप्त करून देण्यासाटीं हें सरस्वतीचें (=वाणीचें) सार क्षेमेन्द्र प्रदर्शित करीत आहे.

तत्राकवेः कवित्वप्राप्तिः शिक्षा प्राप्तगिरः कवेः ।
चमत्कृतिश्च शिक्षाप्तौ गुणदोषोद्गतिस्ततः ॥ ३ ॥

पश्चात्परिचयप्राप्तिः इत्येते पंच संधयः ।
समुद्दिष्टाः क्रमेणैषां लक्ष्यलक्षणं उच्यते ॥ ४ ॥

**भावार्थ**—कवि नसलेल्यास कवित्वाची प्राप्ति होणें, वाणीवर प्रभुत्व मिळविलेल्या कवीनें शिक्षण घेणें, शिक्षण लाभलेल्यानें ( काव्यांत ) चमत्कार निर्माण करणें, त्यानंतर गुण व दोष यांतील तारतम्य ओळखणें व सरतेशेवटीं ( विविध शास्त्रांशीं ) परिचय करून घेणें ( हे विषय डोळ्यांसमोर ठेवून ) पांच संधि ( म्हणजे अध्याय ) संकलिपले आहेत ( हीं नांवें अध्यायांचीं आहेत ). क्रमानें ह्यांचीं लक्षणें व उदाहरणें सांगितलीं जातील.

**सुविभक्तिसमन्वितं बुधैर्गुणसंयुक्तममुक्तसौष्ठवैः ।**
**रचितं पदकैः सुवर्णवत्कविकण्ठाभरणं विचार्यताम् ॥ ५ ॥**

**भावार्थ**— सुप्–तिङ्–आदि विभक्तींनीं समन्वित ( पक्षीं शोभिवंत विभागांनीं युक्त ), गुणांनीं युक्त ( पक्षीं दोरींत गुंफलेल्या ), सौन्दर्यपूर्ण पदांनीं रचिलेल्या ( पक्षीं सुंदर अलंकारपदकांनीं युक्त ) आणि सुंदर वर्णांनीं गुंफिलेल्या ( पक्षीं सोन्याच्या ) ह्या कविकंठाभरणाचा ( पक्षीं कवींनीं कंठीं धारण करण्यास योग्य अशा कंठीचा ) विद्वानांनीं विचार करावा. ( येथील श्लेष हृद्य आहे. )

**अथ इदानीं अकवेः कवित्वशक्तिः उपदिश्यते । प्रथमं तावद् दिव्यः प्रयत्नः, ततः पौरुषः ॥**

**भावार्थ**—आणि आतां कवि नसलेल्यानें कवित्वशक्ति कशी संपादावी त्याचा उपदेश करतों. प्रथम दिव्य प्रयत्न व मग पुरुषाधीन प्रयत्न.

**तत्र दिव्यः ।**

**ॐ स्वस्त्यङ्कं स्तुमः सिद्धमन्तराद्यमितीप्सितम् ।**
**उद्यदूर्जप्रदं देव्या ऋॠऌॡनिगूहनम् ॥ ६ ॥**

**भावार्थ**—दिव्य प्रयत्न असा—मनांत सिद्ध, आद्य असल्यामुळें अभीष्ट असलेल्या, सतत वृद्धिंगत होणारें सामर्थ्य देणाऱ्या व वाग्देवतेच्या ऋ-ॠ-ऌ-ॡ ह्या चिन्हांना लपविणाऱ्या अशा ॐकाररूप स्वस्ति-चिन्हाची

आम्ही स्तुति करतों. ( स्वस्त्यङ्क म्हणजे स्वस्तिकासारखें शुभप्रद चिन्ह ).

एकं ऐश्वर्यसंयुक्तं ओजोवर्धनं औषधम् ।
अन्तरान्तः कलाखण्डगलद्घनसुधाङ्कितम् ॥ ७ ॥

**भावार्थ**— तें एकमेवाद्वितीय, ऐश्वर्ययुक्त व ओजस्विता वाढविणारें औषध असून अत्यन्त निगूढ व चंद्रकळेमधून स्रवणाऱ्या घन ( दाट ) अमृतानें अंकित आहे.

चन्द्रोच्छलज्जलं प्रोज्झदज्ञानं टठसंयुतम् ।
डम्बरप्रौढकिरणं तथतां दधदुन्नतम् ॥८॥

**भावार्थ**—चन्द्रामधून उचंबळणारें जल त्यास लाभतें; तें अज्ञान दूर करतें; तें ट व ठ यांनीं युक्त आहे; त्यांत विपुल व दाट किरण आहेत; तें त व थ यांचा आकार धारण करणारें असून उन्नत आहे.

परं फलप्रदं बद्धमूलोद्भवमयं वपुः ।
रम्यं लघुवरं शर्म वर्षत्सर्वसहाक्षरम् ॥९॥

**भावार्थ**—तें अतिशय फलप्रद असून त्याचें शरीर दृढमूल झालेल्या अंकुराचें बनलेलें आहे. तें रमणीय, अतिशय लहान ( वा हलकें ); सुखाचा वर्षाव करणारें, सर्व सहन करणारें आणि अक्षय आहे.

एतां नमः सरस्वत्यै यः क्रियामातृकां जपेत् ।
क्षेमं ऐन्द्रं स लभते भव्योऽभिनववाग्भवम् ॥१०॥

**भावार्थ**—सरस्वतीस नमस्कार असो. जो सज्जन ही क्रियामातृका ( म्हणजे सहाव्या श्लोकाच्या मध्यें आलेल्या 'अन्तः' शब्दापासून तों नवव्या श्लोकान्तीं आलेल्या 'सहाक्षरम्' येथपर्यंतचा देवी सरस्वतीचा मंत्र ) जपेल त्याला अभिनव वाणीपासून उत्पन्न होणारें परमोच्च ( ऐन्द्र ) कल्याण ( क्षेम ) प्राप्त होईल. ( येथील क्षेमं ऐन्द्रं या शब्दांनीं ग्रंथकारानें स्वतःच्या नांवाचाहि उल्लेख जातां-जातां केला आहे, हें लक्षात येईल. )

**श्वेतां सरस्वतीं मूर्ध्नि चन्द्रमण्डलमध्यगाम् ।**
**अक्षराभरणां ध्यायेत् वाङ्मयामृतवर्षिणीम् ॥११॥**

**भावार्थ**—शुभ्र वर्णाच्या, चंद्रमंडलाच्या मध्यें राहणाऱ्या, अक्षरांचे ( अथवा अविनाशी स्वरूपाचे ) अलंकार धारण करणाऱ्या आणि वाङ्मय ( = ज्ञान ) रूपी अमृताची वृष्टि करणाऱ्या सरस्वतीचें मनांत ध्यान करावें.

**त्रिकोणयुगमध्ये तु तडित्तुल्यां प्रमोदिनीम् ।**
**स्वर्गमार्गोद्गतां ध्यायेत् परां अमृतवाहिनीम् ॥१२॥**

**भावार्थ**—विजेसारख्या असलेल्या, आनंदी (व आनंददायिनीहि), स्वर्गीय मार्गातून प्रकट होणाऱ्या ( किंवा आकाशांत प्रकट होणाऱ्या विजेप्रमाणें तेजस्वी असलेल्या ), श्रेष्ठ व अमृताची जणूं नदी असलेल्या सरस्वतीचें दोन त्रिकोणांच्या मध्यें ध्यान करावें.

**निर्विकारां निराकारां शक्तिं ध्यायेत् परात्पराम् ।**
**एषा बीजत्रयी–वाच्या त्रयी वाक्काममुक्तिसूः ॥१३॥**

**भावार्थ**—विकाररहित, आकारशून्य व श्रेष्ठाहून श्रेष्ठ असलेल्या शक्तीचें ध्यान करावें. ही शक्ति बीजत्रयीनें ( बीजमंत्रानें ) वाच्य ( प्रकट होणारी ) आहे. हा बीजमंत्र ( ऐं क्लीं सौः ) काम व मोक्ष ह्या पुरुषार्थांना प्रसविणारा आहे.

**काव्यक्रियेच्छाङ्कुरमूलभूमिमन्विष्य विश्रान्तिबलेन मोक्षः ।**
**अन्यावधाने मदनस्य मोक्षस्तृतीयबीजे सकलेऽस्ति मोक्षः ॥१४॥**

**भावार्थ**—काव्यनिर्मितीच्या इच्छारूप अंकुराच्या मूळ उगमस्थानाच्या ( वरील बीजत्रयींतील 'ऐं'चा ), थोड्याशा अवधानानें, शोध घेतला कीं, वाणी मुक्त ( म्हणजे अनन्यपरतंत्र, अप्रतिहत ) होते. दुसऱ्यावर ( म्हणजे

'क्लीं'वर ) लक्ष एकाग्र केलें कीं, कामवासनेचा मोक्ष ( म्हणजे वैयक्तिक वासनांचा क्षय ) होतो. ( आणि ) समस्त तृतीय बीजावर लक्ष केंद्रित केल्यानें मोक्ष प्राप्त होतो. ( म्हणजे मन आनंदैकनिर्भर होतें. ) [ येथें तृतीय बीज म्हणजे बीजमंत्राचा सौः हा भाग ].

**अथ पौरुषः—**

**तत्र त्रयः शिष्याः काव्यक्रियायां उपदेश्याः—अल्पप्रयत्नसाध्यः कृच्छ्रसाध्यः असाध्यश्च इति ।**

**भावार्थ**—आतां मानवी प्रयत्नाचा विचार करूं. ज्यांना काव्य-निर्मितीच्या कलेचा उपदेश करावयाचा असे शिष्य तीन प्रकारचे असतात—ज्यांना थोडयाशा प्रयत्नांनीं काव्यनिर्मिति करतां येते असे, ज्यांना दीर्घ परिश्रमांनंतर ती जमते असे व ज्यांना ती मुळींच साधत नाहीं असे.

तत्र प्रथमः—

**कुर्वीत साहित्यविदः सकाशे श्रुतार्जनं काव्यसमुद्भवाय ।**
**न तार्किकं केवलशाब्दिकं वा कुर्याद् गुरुं सूक्तिविकासविघ्नम् ।।१५।।**

**भावार्थ**—( उत्तम ) काव्य निर्माण व्हावें ह्यासाठीं ( शिष्यानें ) साहित्यशास्त्र जाणणाऱ्यापाशीं बसून ज्ञान प्राप्त करावें. ( परन्तु ) उत्कृष्ट काव्याच्या विकासाला ( उद्भवाला ) विघ्नरूप ठरणाऱ्या एखाद्या तर्क-शास्त्रज्ञाला किंवा केवळ शब्दज्ञानी वैयाकरणाला आपला गुरु ( कधींच ) करूं नये.

**विज्ञातशब्दागमनामधातुश्छन्दोविधाने विहितश्रमश्च ।**
**काव्येषु माधुर्यमनोरमेषु कुर्यादखिन्नः श्रवणाभियोगम् ।।१६।।**

**भावार्थ**—शब्दशास्त्रांतील ( म्हणजे व्याकरणांतील ) नाम, धातु इत्यादि ज्याला चांगल्या प्रकारें समजले आहेत, छन्दोरचना ज्यानें परिश्रमपूर्वक समजून घेतली आहे, अशा शिष्यानें माधुर्यामुळें रमणीय झालेलीं काव्यें ऐकण्याचा उद्योग निरलसपणें करावा.

**गीतेषु गाथास्वथ देशभाषाकाव्येषु दद्यात् सरसेषु कर्णम् ।**
**वाचां चमत्कारविधायिनीनां नवार्थचर्चासु रुचिं विदध्यात् ॥१७॥**

**भावार्थ**—त्यानें गीतें, गाथा ( लोकगीतें ) आणि देशी भाषांत (म्ह० प्राकृतांत) लिहिलेलीं रसाळ काव्यें (लक्ष देऊन) ऐकावींत; वाणीचें सौंदर्य प्रकट करणाऱ्या काव्यांतील अभिनव अर्थ शोधून काढण्यासाठीं होणाऱ्या चर्चांमध्यें आवडीनें भाग घ्यावा.

**रसे रसे तन्मयतां गतस्य गुणे गुणे हर्षवशीकृतस्य ।**
**विवेकसेकस्वकपाकभिन्नं मनः प्रसूतेऽङ्कुरवत्कवित्वम् ॥१८॥**

**भावार्थ**—विविध रसांच्या आस्वादांत तल्लीन झालेलें, वेगवेगळ्या आनंदायक गुणांनीं आकृष्ट झालेलें मन, विवेकाच्या सिंचनानें परिपक्व होत्सातें उफाळून येऊन, आंतमध्यें पक्व झालेल्या अंकुराप्रमाणें असलेल्या कवित्वाला, जन्म देतें.

**अथ द्वितीयः—**

**पठेत्समस्तान्किल कालिदासकृतप्रबन्धानितिहासदर्शी ।**
**काव्याधिवासप्रथमोद्गमस्य रक्षेत्पुरस्तार्किकगन्धमुग्रम् ॥१९॥**

**भावार्थ**—आतां दुसऱ्या प्रकारच्या शिष्यानें इतिहासावर दृष्टि खिळवून, कालिदासानें लिहिलेल्या यच्चयावत् प्रबन्धांचा ( काव्यकृतींचा वा ग्रंथांचा ) अभ्यास करावा. त्यानें काव्याच्या अधिवासाच्या, नुकत्याच येऊं लागलेल्या सुगंधाचें, तर्कशास्त्राच्या उग्र वासापासून रक्षण करावें.

**महाकवेः काव्यनवक्रियायै तदेकचित्तः परिचारकः स्यात् ।**
**पदे च पादे च पदावशेषसम्पूरणेच्छां मुहुराददीत ॥२०॥**

**भावार्थ**—अभिनव काव्यनिर्मितीसाठीं आदर्श म्हणून मानलेल्या महाकवीची ( शिष्यानें ) एकाग्रचित्तानें परिचर्या ( सेवा ) करावी. तसेंच, पदांतील तसेंच पादांतील आणि पदावयवांतील मोकळी जागा भरण्याची इच्छा त्यानें वरचेवर धरावी.

**अभ्यासहेतोः पदसन्निवेशैः वाक्यार्थशून्यैः विदधीत वृत्तम् ।**
**श्लोकं परावृत्तिपदैः पुराणं यथास्थितार्थं परिपूरयेच्च ॥२१॥**

**भावार्थ**—( पद्यरचनेची ) संवय व्हावी ह्यासाठीं त्यानें शब्द एकत्र आणून वृत्तरचना करावी–मग असे शब्द वाक्यार्थरहित कां असेनात ! त्यानें एखादा जुनाच श्लोक घेऊन, मूळ अर्थ कायम राहील अशा बेतानें, शब्दांची फिरवाफिरव करून नवीन श्लोकरचना करावी.

**तत्र वाक्यार्थशून्यं यथा—**

**आनन्दसन्दोहपदारविन्दकुन्देन्दुकन्दोदितबिन्दुवृन्दम् ।**
**इन्दिन्दिरान्दोलितमन्दमन्दनिष्यन्दनन्दन्मकरन्दवन्द्यम् ॥**

**भावार्थ**—वाक्य ह्या नात्यानें अर्थरहित पदसमूह असा—

हीं पदें वाक्यार्थशून्यच असल्यामुळें भावार्थ तो काय सांगावयाचा ?

परावृत्तिपदैर्यथा—

**वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।**
**जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥**

( रघुवंश १/१ )

**वाण्यर्थाविव संयुक्तौ वाण्यर्थप्रतिपत्तये ।**
**जगतो जनकौ वन्दे शर्वाणीशशिशेखरौ ॥**

**भावार्थ**—शब्दांची फिरवाफिरव करून श्लोकाची पुनर्रचना अशी—

शब्द आणि त्याचा अर्थ यांचें ज्ञान व्हावें ह्यासाठीं शब्द व अर्थ ह्यांचेप्रमाणें संपृक्त ( संयुक्त ) असलेल्या पार्वती व परमेश्वर ह्या जगताच्या मातापित्यांना मी वन्दन करतों. ( कालिदासाच्या श्लोकाचा अर्थ कायम ठेवून श्लोकगत शब्दांची फिरवाफिरव केली आहे व एक नवीन श्लोक रचिला आहे, हें येथें स्पष्ट होतें. )

अथ तृतीयः—

यस्तु प्रकृत्याश्मसमान एव कष्टेन वा व्याकरणेन नष्टः ।
तर्केण दग्धोऽनलधूमिना वाऽप्यविद्धकर्णः सुकविप्रबन्धैः ॥२२॥
न तस्य वक्तृत्वसमुद्भवः स्यात् शिक्षाविशेषैरपि सुप्रयुक्तैः ।
न गर्दभो गायति शिक्षितोऽपि संदर्शितं पश्यति नार्कमन्धः ॥२३॥

**भावार्थ**—जो स्वभावतः दगडासारखाच ( म्हणजे अविकार्यच ) आहे, वा जो कष्टदायक व्याकरणाभ्यासानें खचला (अक्षरशः नष्ट झाला) आहे, अथवा जो तर्कशास्त्राच्या अग्नीनें पोळून निघाला ( शब्दशः दग्ध झाला ) आहे अथवा सत्कवींच्या काव्यकृतींनीं ज्याचीं श्रवणेंद्रियें सुसंस्कृत ( शब्दशः भोंसकलीं गेलेलीं ) झालेलीं नाहींत त्याला उत्तम प्रकारें ( म्हणजे विशेष परिश्रम घेऊन ) विशेष शिक्षण देण्याचे कितीहि प्रयत्न केले तरी त्याचे ठायीं उत्तम वक्तृत्व कधींच उत्पन्न होणार नाहीं. ( तात्पर्य, त्याच्या वाणीला काव्यानुकूल वळण कधींच प्राप्त होणार नाहीं. ) गाढवाला कितीहि शिकविलें-पढविलें तरीहि त्याला गातां येत नाहीं. आंधळयाला सूर्य दाखवला तरी तो त्याला दिसत नाहीं.

इति ततसुकृतानां प्राक्तनानां विपाके
भवति शुभमतीनां मन्त्रसिद्धं कवित्वम् ।
तदनु पुरुषयत्नैः धीमतां अभ्युदेति
स्फुरति जडधियां श्रीशारदा साधनेन ॥२४॥

**भावार्थ**—अशा प्रकारें पूर्वजन्मांच्या अनेक पुण्यकृत्यांचा परिपाक होऊन शुद्धमति पुरुषांना मंत्रद्वारें सिद्ध अशी कवित्वशक्ति प्राप्त होते. तदनंतर बुद्धिमंतांनीं केलेल्या पौरुष ( मानवी ) प्रयत्नांच्या योगें श्रीशारदेचा त्यांचे ठायीं उदय होतो. आणि मंदबुद्धीच्या पुरुषांना साधना केल्यानें श्रीशारदेचें स्फुरण होतें.

इति श्रीव्यासदासापराख्यक्षेमेन्द्रकृते कविकण्ठाभरणे कवित्वप्राप्तिः प्रथमः सन्धिः ।

**भावार्थ**—अशा प्रकारें व्यासदास-क्षेमेन्द्रानें लिहिलेल्या कविकंठाभरणांतील कवित्वप्राप्ति नामक प्रथम संधि समाप्त झाला.

**संक्षिप्त विवरण**—कविकंठाभरण लिहिण्यामागें क्षेमेन्द्राचा उद्देश, होतकरू कवींना मार्गदर्शन करणें व पंडितांच्या ज्ञानांत भर घालणें, असा दुहेरी आहे, हें श्लोकांक दोनवरून स्पष्ट होतें. तसेंच त्याचे सुस्पष्ट विचार व आत्मविश्वास हे दोन्ही विशेषहि प्रतीत होतात. पहिल्या चवदा श्लोकांवरून क्षेमेन्द्राचा योगशास्त्र व मंत्रशास्त्र या शास्त्रांशीं चांगलाच परिचय होता हें कळून येतें. शुष्क वैयाकरण व तार्किक हे काव्यप्रांतांत वावरावयास सर्वथा अपात्र आहेत अशी त्याची धारणा दिसते ( श्लोक १५ व १९ ). पंधराव्या श्लोकाशीं 'शब्दार्थशासनज्ञानमात्रेणैव न वेद्यते । वेद्यते स तु काव्यार्थतत्त्वज्ञैरेव केवलम् ।।' ( ध्वन्यालोक १.७ ) ह्या श्लोकाची तुलना करणें उद्बोधक आहे. क्षेमेन्द्राच्या काळांत काव्य-वाचनाचे जाहीर कार्यक्रम होत असावेत असें अनुमान सोळाव्या श्लोका-वरून निघतें. सतराव्या श्लोकांत उल्लेखिलेल्या देशभाषा म्हणजे अपभ्रंश भाषा तर नव्हत ? अभिजात कवीचें काव्य विवेकसिंचनानें परिणत ( प्रगल्भ ) बनतें व तें उफाळून येतें असें क्षेमेन्द्र म्हणतो ( श्लोक १८ ) ही विशेष महत्त्वाची बाब आहे. त्याची कालिदासावर विशेष भक्ति दिसते. ( श्लोक १९ ).

## द्वितीयः सन्धिः ।

छायोपजीवी पदकोपजीवी पादोपजीवी सकलोपजीवी ।
भवेदथ प्राप्तकवित्वजीवी स्वोन्मेषतो वा भुवनोपजीव्यः ॥ १ ॥

**भावार्थ**—( कवि ) दुसऱ्या कवीच्या छायेंत वाढणारा ( शब्दशः परकवीच्या छायेवर जगणारा ), किंवा दुसऱ्या कवीच्या पदांवर जगणारा, किंवा पादावर ( म्हणजे अखंड ओळीवर ) जगणारा, किंवा अखंड काव्यावर जगणारा असतो. अथवा तो स्वतः परिश्रमांनीं संपादिलेल्या कवित्वशक्तीवर जगतो किंवा स्वतःच्या प्रज्ञोन्मेषामुळें ( म्हणजे प्रतिभेमुळें ) अवघ्या जगाचा आश्रयदाता ठरतो. ( क्षीण प्रतिभा लाभलेले कवि दुसऱ्या कवींच्या काव्यांवर जगतात. पण उच्च दर्जाची प्रतिभा लाभलेले कवि सर्व जगाला उजळून टाकतात व अशा कवींवर इतर सामान्य कवि जगून प्रतिष्ठा मिळवितात, हा अभिप्राय ).

छायोपजीवी यथा भट्टभल्लटस्य—

ननु आश्रयस्थितिरियं तव कालकूट !
केनोत्तरोत्तरविशिष्टपदोपदिष्टा ।
प्रागर्णवस्य हृदये वृषलक्ष्मणोऽथ
कण्ठेऽधुना वससि वाचि पुनः खलानाम् ॥

**भावार्थ**—'छायोपजीवी'कवि. उदा० भट्टभल्लटाचा पुढील श्लोक.

हे कालकूट ( अत्यंत घातक ) विषा ! उत्तरोत्तर विशिष्ट ( श्रेष्ठ ) होत जाणाऱ्या ह्या स्थानांचा आश्रय घेण्याचा उपदेश तुला कोणीं केला ? पूर्वी तूं महासागराच्या हृदयांत होतेंस, त्यानंतर शंकराच्या कंठांत आणि आतां तूं दुर्जनांच्या वाणींत राहात आहेस.

यथा च श्रीमदुत्पलराजदेवस्य—

**मात्सर्यतीव्रतिमिरावृतदृष्टयो ये**
**ते कस्य नाम न खला व्यथयन्ति चेतः।**
**मन्ये विमुच्य गलकन्दलमिन्दुमौले-**
**र्येषां सदा वचसि वल्गति कालकूटः॥**

**भावार्थ**—आणि आतां श्रीमत् उत्पलराजदेवाचा खालील श्लोक पाहा—

ज्यांचे दृष्टीवर तीव्र मत्सराच्या अंधकाराचें पटल आलेलें असतें आणि चंद्रशेखराच्या ( म्हणजे शंकराच्या ) कंठाचा त्याग करून आलेलें कालकूट विष ज्यांच्या भाषणांत नेहमीं नाचत असतें असे दुष्ट पुरुष कोणाचें अंतःकरण व्यथित करीत नाहींत ? ( सर्वांचें करतात, हा अभिप्राय ).

पदकोपजीवी यथा मुक्ताकणस्य—

**यथा रन्ध्रं व्योम्नश्चलजलदधूमः स्थगयति।**
**स्फुलिङ्गानां रूपं दधति च यथा कीटमणयः।**
**यथा विद्युज्ज्वालोल्लसनपरिपिङ्गाश्च ककुभ-**
**स्तथा मन्ये लग्नः पथिकतरुखण्डे स्मरदवः॥**

**भावार्थ**—पदकोपजीवी कवि; उदाहरणार्थ, मुक्ताकणाचा पुढील श्लोक पाहा.

जसजसा गतिशील मेघरूपी धूम आकाशाची पोकळी भरून काढतो, जसजसे काजवे ठिणग्यांचें रूप धारण करतात, जसजशा विजेच्या चमकाऱ्यांच्या प्रकाशानें दिशा पूर्णपणें पिंगट रंगाच्या होतात, तसतसें असें वाटतें कीं, पांथस्थरूपी अरण्यांत कामरूपी वणवा पेटला आहे.

यथा च एतद्भ्रातुश्चक्रपालस्य—

सरस्यां एतस्यां उदरवलिवीचीविलुलितं
यथा लावण्याम्भो जघनपुलिनोल्लङ्घनकरम् ।
यथा लक्ष्यश्चायं चलननयनमीनव्यतिकर-
स्तथा मन्ये मग्नः प्रकटकुचकुंभः स्मरगजः ॥

**भावार्थ**—ह्याचा भाऊ जो चक्रपाल त्याचा, उदाहरणार्थ, पुढील श्लोक पाहा—

जेव्हां ह्या सौंदर्यसरोवरांतील लावण्यरूपी जल हिच्या पोटावरील वळ्यांच्या रूपाच्या लहरींनीं आंदोलित होऊन मांड्यांच्या किनाऱ्याचें उल्लंघन करतें, आणि जेव्हां हिच्या चंचल नेत्रांच्या रूपाचा माशांचा संघ लक्षित होतो ( दिसतो ) तेव्हां हिच्या उन्नत स्तनांच्या रूपाचें गंडस्थळ असलेला कामरूपी हत्ती रुतला आहे, असें मला वाटतें.

पादोपजीवी यथा अमरकस्य— [ अमरुशतक १६२ ]

गन्तव्यं यदि नाम निश्चितमहो गन्तासि केयं त्वरा
द्वित्राण्येव दिनानि तिष्ठतु भवान्पश्यामि यावन्मुखम् ।
संसारे घटिकाप्रणालविगलद्धारा समे जीविते
को जानाति पुनस्त्वया सह मम स्याद्वा न वा सङ्गमः ॥

**भावार्थ**—पादोपजीवी कवि. उदा० अमरकाचा पुढील श्लोक—

असो, जाणें जर आवश्यकच असेल तर अवश्य जा. पण इतकी घाई कसली ? आणखी दोनतीनच दिवस थांब. तोंवर तुझें मुख मी चांगलें न्याहाळून ( मनांत ठसवून ठेवतें ). ह्या जगांतील जीवन घटिकापात्रा-मधून पाझरणाऱ्या जलबिंदूप्रमाणें ( विनाशी ) आहे. त्यामुळें तुझ्याशीं फिरून माझा संगम होईल—न होईल, तें कुणाला ठाऊक ?

यथा मम—

हंहो स्निग्धसखे ! विवेक ! बहुभिः प्राप्तोऽसि पुण्यैर्मया
गन्तव्यं कतिचिद् दिनानि भवता नास्मत्सकाशात्क्वचित् ।

त्वत्सङ्गेन करोमि जन्ममरणोच्छेदं गृहीतत्वरः
को जानाति पुनस्त्वया सह मम स्याद् वा न वा सङ्गमः ॥

**भावार्थ**—उदाहरणार्थ, माझ्या खालील श्लोकाची वरील श्लोकाशीं तुलना करा—

हं, तर प्रियमित्रा, विवेका! अनेक पुण्यकृत्यांच्या योगें तूं मला लाभलास. तूं थोड्या दिवसांसाठीं ( सुद्धां ) मजपासून कोठेंहि दूर जातां कामा नये. तुझ्या संगतींत, घाईगर्दी करून, मी जन्म व मरण यांचा ( कायमचा ) नाश करीन. तुझा सहवास पुनश्च मला लाभेल कीं न लाभेल, तें कोणीं सांगावें ?

सकलोपजीवी यथा आर्यभट्टस्य—

शब्दैर्निसर्गकटुभिर्मलिनस्वभावाः
श्रोत्रं खला निगडवत्परितस्तुदन्ति ।
श्रव्यैरलुप्तमदबन्धतयाऽतिमञ्जु
मञ्जीरवत्तु सुजना जनयन्ति मोदम् ॥

**भावार्थ**—सकलोपजीवी कवि. उदाहरणार्थ आर्यभट्टाचा पुढील श्लोक—

दुष्ट स्वभावाचे दुर्जन आपल्या स्वभावकटु भाषणानें, एखादा साखळदंड देतो त्याप्रमाणें, सर्वतोपरी त्रास देतात. उलट सज्जन पुरुष आपल्या श्रुतिसुभग, आनंददायक व ( पायांतील ) पैंजणाप्रमाणें अतिशय मंजुळ अशा भाषणानें आल्हाद देतात.

यथा च भट्टबाणस्य— [ कादंबरी पूर्वभाग ६ ]

कटु क्वणन्तो मलदायकाः खलास्तुदन्त्यलं बन्धनशृङ्खला इव ।
मनस्तु साधुध्वनिभिः पदे पदे हरन्ति सन्तो मणिनूपुरा इव ॥

**भावार्थ**—उदाहरणार्थ, भट्टबाणाच्या ह्या श्लोकाची वरील श्लोकाशीं तुलना करा.

कडु बोलणारे व अंतःकरणावर मालिन्याचा कलंक उमटविणारे

दुष्ट लोक, पायांतील बेड्यांप्रमाणें, अतिशय पीडा देतात. तर उलट सज्जन लोक सुंदर शब्दांनीं, रत्नजडित पैंजणाप्रमाणें, पावलोपावलीं आपलें चित्त चोरतात.

भुवनोपजीव्यो यथा भगवान् व्यासः । तथा चोक्तम्––

**इदं कविवरैः सर्वैः आख्यानं उपजीव्यते ।**
**उदयं प्रेप्सुभिर्भृत्यैः अभिजात इवेश्वरः ॥**

**भावार्थ**––भुवनोपजीव्य कवि––उदाहरणार्थ महर्षि व्यास. म्हटलेंच आहे कीं, ज्याप्रमाणें आपापल्या अभ्युदयाची तीव्र इच्छा बाळगणारे सेवक एखाद्या उदारहृदयी मालकाच्या आश्रयावर जगतात, त्याप्रमाणें व्यासांच्या ह्या आख्यानावर ( म्हणजे महाभारतावर ) सर्व मोठमोठे कवी आपली उपजीविका चालवितात. ( महाभारतांतील आख्यानोपाख्यानें निवडून त्यांवर आपलीं काव्यें वा नाटकें लिहून प्रतिष्ठा मिळवितात, हा अभिप्राय. )

[ क्षेमेन्द्र व्यासांना भुवनोपजीव्य मानतो आणि वाल्मीकींना सर्वोपजीव्य व कवींमध्यें चक्रवर्ती मानतो. (पाहा—रामायणमंजरी श्लोकांक ४). वाङ्मयचौर्याची प्रथा बरीच जुनी दिसते. कारण बाणभट्टहि तिचा पुढीलप्रमाणें उल्लेख करतांना आढळतो—'अन्यवर्णपरावृत्त्या बन्धचिन्हनिगूहनैः । अनाख्यातः सतां मध्ये कविश्चौरो विभाव्यते ॥' ( हर्षचरित १ ६ ) ]

प्राप्तगिरः कवे शिक्षास्तावद् आह––

**व्रतं सारस्वतः यागः पूर्वं विघ्नेशपूजनम् ।**
**विवेकशक्तिरभ्यासः सन्धानं प्रौढिरश्रमः ॥ २ ॥**

**भावार्थ**—वाणीवर प्रभुत्व संपादिलेल्या कवीच्या शिक्षणाविषयीं सांगतात—( अशा कवीनें ) सरस्वतीच्या प्रीत्यर्थ व्रत पाळावें, यज्ञ करावा आणि सर्वप्रथम विघ्नेशाचें म्हणजे गणेशाचें पूजन करावें.

त्यानें विवेकशक्ति संपादावी. निरंतर ( काव्यलेखनाची ) संवय ठेवावी. अभिनव अर्थांचें अनुसंधान करावें. ( तसें केल्यानें त्याला ) सहजतापूर्ण ( कष्ट-असाध्य ) काव्यरचना करतां येईल.

**वृत्तपूरणं उद्योगः पाठः परकृतस्य च ।**
**काव्याङ्गविद्याधिगमः समस्यापरिपूरणम् ॥ ३ ॥**

**भावार्थ**—त्यानें वृत्तपूर्तीचा प्रयत्न ( सतत ) करीत राहिलें पाहिजे आणि इतरांची काव्यें वाचलीं पाहिजेत. ( तसेंच ) काव्यनिर्मितीस उपकारक अशा इतर शास्त्रांचें ज्ञान संपादिलें पाहिजे आणि समस्या-पूर्ति करण्यास शिकलें पाहिजे.

**सहवासः कविवरैः महाकाव्यार्थचर्वणम् ।**
**आर्यत्वं सुजनैर्मैत्री सौमनस्यं सुवेषता ॥ ४ ॥**

**भावार्थ**—त्यानें श्रेष्ठ कवींच्या सहवासांत राहिलें पाहिजे; महाकाव्यांच्या अर्थाची ( अथवा विषयांची ) मनांत पुनःपुन्हां चर्वणा केली पाहिजे ( तसें केल्यानें अर्थसौंदर्याचीं अनेक स्थळें प्रतीत होतील व महाकाव्याच्या विषयाचे विविध पैलू कसे सजवून मांडावेत तें लक्षांत येईल. ); मन उदार ठेवावयास हवें; तसेंच त्यानें सज्जनांशीं सख्य जोडावें व नेहमीं चांगला वेष परिधान करून वावरावें ( तात्पर्य, सज्जनमैत्रीनें चित्तवृत्तींचा व सुवेषानें शरीराचा सुसंस्कृतपणा संपादावा. )

**नाटकाभिनयप्रेक्षा शृङ्गारालिङ्गिता मतिः ।**
**कवीनां सम्भवे दानं गीतेन आत्माधिवासनम् ॥ ५ ॥**

**भावार्थ**—त्यानें नाटकाचा प्रयोग पाहावा व वृत्ति शृंगाररसमय ठेवावी. इतर कवींना यथासंभव मदत करावी. मनांत संगीताला स्थान द्यावें ( सतत संगीत ऐकून मन प्रसन्न व काव्यानुकूल ठेवावें. )

**लोकाचारपरिज्ञानं विविक्ताख्यायिकारसः ।**
**इतिहासानुसरणं चारुचित्रनिरीक्षणम् ॥ ६ ॥**

**भावार्थ**—त्यानें लौकिक शिष्टाचारांचें परिपूर्ण ज्ञान संपादन करावें, सद्भिरुचिसंपन्न कथा-आख्यायिकांविषयीं गोडी बाळगावी, इतिहासाचें अनुशीलन करावें व सुंदर चित्रांचें निरीक्षण करावें.

**शिल्पिनां कौशलप्रेक्षा वीरयुद्धावलोकनम् ।**
**शोकप्रलापश्रवणं श्मशानारण्यदर्शनम् ॥ ७ ॥**

**भावार्थ**—कलाकारांच्या ( कारागिरांच्या ) कलाकौशल्याचें चांगल्या-प्रकारें निरीक्षण करावें, मल्लांचीं युद्धें अवलोकन करावींत, शोकमग्न व्यक्तींचा विलाप ऐकावा तसेंच स्मशानें व अरण्यें पाहावींत.

**व्रतिनां पर्युपास्ता च नीडायतनसेवनम् ।**
**मधुरस्निग्धमशनं धातुसाम्यं अशोकता ॥ ८ ॥**

**भावार्थ**—व्रतस्थ व्यक्तींची सेवा करावी, कबूतर वगैरे पक्ष्यांचीं घरटीं तसेंच मनुष्यांचीं घरें यांचें निरीक्षण करावें, गोड व स्निग्ध पदार्थ खावेत, चित्तवृत्तींचा समतोल राखावा आणि दुःखीकष्टी असूं नये.

**निशाशेषे प्रबोधश्च प्रतिभा स्मृतिरादरः ।**
**सुखासनं दिवा शय्या शिशिरोष्णप्रतिक्रिया ॥ ९ ॥**

**भावार्थ**—थोडी रात्र शिल्लक असतांना उठावें, बुद्धि ताजीतवानी ठेवावी, श्रद्धेनें अनुभवांचें स्मरण करावें, प्रशस्त व सुखावह आसनावर बसावें, दिवसा थोडी झोप घ्यावी, आणि हिंवाळा-उन्हाळा इत्यादि ऋतूंची बाधा स्वतःला होऊं देऊं नये.

**आलोकः पत्रलेख्यादौ गोष्ठीप्रहसनज्ञता ।**
**प्रेक्षा प्राणिस्वभावानां समुद्राद्रिस्थितीक्षणम् ॥ १० ॥**

**भावार्थ**—पत्रें, कोरीव लेख वगैरे पाहावेत, सभा-संमेलनांत विनोदी भाषण करण्याची चातुरी दाखवावी, प्राण्यांच्या स्वभावधर्मांचें अवलोकन करावें, तसेंच समुद्र, पर्वत इत्यादींचा परिसर न्याहाळावा.

**रवीन्दुताराकलनं सर्वर्तुपरिभावनम् ।**
**जनसङ्घाभिगमनं देशभाषोपजीवनम् ॥ ११ ॥**

**भावार्थ**—सूर्य, चन्द्र, तारे यांच्या गतीचें ज्ञान करून घ्यावें, सर्व ऋतूंचाहि परिचय करून घ्यावा. सभा, बैठकी इत्यादींत भाग घ्यावा, आणि देशी भाषेचा उपयोग करावा. ( ज्या देशांत जी भाषा प्रचलित असेल त्या देशांत त्या भाषेमधून वाग्व्यवहार करावा. )

**आधानोद्धरणप्रज्ञा कृतसंशोधनं मुहुः ।**
**अपराधीनता यज्ञसभाविद्यागृहस्थितिः ॥ १२ ॥**

**भावार्थ**—शब्दांची निवड व त्याग यांचें ज्ञान त्यानें संपादावें ( म्हणजे अनुचित शब्द टाळण्याची व उचित शब्द योजण्याची कुशलता त्यानें संपादावी. ), वारंवार चिकित्सक बुद्धीनें आपल्या लेखनावर हात फिरवून तें शुद्ध करण्याकडे वृत्ति ठेवावी, त्यानें स्वतंत्र असावें ( कोणाचीहि ताबेदारी पत्करूं नये ), आणि यज्ञसभा व विद्यालयें यांचे वरचेवर अवलोकन करून त्यांचें स्वरूप समजून घ्यावें

**अतृष्णता निजोत्कर्षे परोत्कर्षविमर्शनम् ।**
**आत्मश्लाघाश्रुतौ लज्जा परश्लाघानुभाषणम् ॥ १३ ॥**

**भावार्थ**—स्वतःच्या अभ्युदयाची हांव बाळगूं नये, दुसऱ्यांचा उत्कर्ष सहन करावा. स्वतःची स्तुति कानावर पडल्यास लज्जित व्हावें ( नम्रतेनें आत्मप्रशंसा ऐकावी, प्रौढी मिरवूं नये ) आणि दुसऱ्याच्या स्तुतिपर संभाषणांत भाग घ्यावा.

**सदा स्वकाव्यव्याख्यानं वैरमत्सरवर्जनम् ।**
**परोन्मेषजिगीषा च व्युत्पत्त्यै सर्वशिष्यता ॥ १४ ॥**

**भावार्थ**—स्वतःच्या काव्याचें विवरण करण्यास नेहमीं तत्पर असावें. कोणाशींहि वैर करूं नये, तसेंच कोणाचाहि मत्सर करूं नये. दुसऱ्या प्रज्ञावंत कवीवर मात करण्याची आकांक्षा बाळगावी आणि ज्ञान संपादण्यासाठीं कोणाचेंहि शिष्यत्व ( आनंदानें ) पत्करावें.

**पाठस्य अवसरज्ञत्वं श्रोतृचित्तानुवर्तनम् ।**
**इङ्गिताकारवेदित्वं उपादेयनिबन्धनम् ॥ १५ ॥**

**भावार्थ**—अभ्यासाला अनुकूल वेळेचें नेहमीं भान ठेवावें, श्रोत्यांच्या चित्ताचा ठाव घेऊन ( रसिकमनाचा कानोसा घेऊन ) त्याप्रमाणें वागावें; मुद्रा, सूचना, खाणाखुणा इत्यादि जाणाव्यात, व उत्कृष्ट वस्तूंचा संग्रह करावा.

**उपदेशविशेषोक्तिः अदीर्घरससङ्गतिः ।**
**स्वसूक्तप्रेषणं दिक्षु परसूक्तपरिग्रहः ॥ १६ ॥**

**भावार्थ**—स्वतच्या वैशिष्टयपूर्ण विधानांचें वा मुद्यांचें त्याला विवेचन करतां आलें पाहिजे. त्यानें एकाच रसाचा दीर्घकाळपर्यंत आस्वाद घेत राहूं नये. स्वतःच्या निवडक, सुंदर रचना दूरदेशीं धाडाव्यात व इतरांच्या सुंदर रचनांचा आस्वादार्थ संग्रह करावा.

**वैदग्ध्यं पटुताभंगिनिःसङ्गैकान्तनिर्वृतिः ।**
**आशापाशपरित्यागः सन्तोषः सत्त्वशीलता ॥ १७ ॥**

**भावार्थ**—त्यानें विदग्धता वा कुशलता अंगीं बाणवावी. त्याचें बोलणें चमकदार असावें. निःसंग होऊन एकांतांत बसण्यांत अत्यंत आनंद मानावा. आशापाश तोडावेत व समाधानी राहून वृत्तीनें सात्त्विक असावें.

**अयाचकत्वं अग्राम्यपदालापः कथास्वपि ।**
**काव्यक्रियासु निर्बन्धो विश्रान्तिश्चान्तरान्तरा ॥ १८ ॥**

**भावार्थ**—त्यानें मदतीसाठीं कधींच हात पुढें पसरूं नये. तसेंच नित्याच्या संभाषणांत सुद्धां ग्राम्य शब्द उच्चारूं नयेत. काव्य-रचनेचे बाबतींत कांहीं नियम स्वतःवर लादून घ्यावेत आणि मधूनमधून विश्रांति घ्यावी.

**नूतनोत्पादने यत्नः साम्यं सर्वसुरस्तुतौ ।**
**पराक्षेपसहिष्णुत्वं गांभीर्यं निर्विकारता ॥ १९ ॥**

**भावार्थ**—नवीन काव्यनिर्मितीचा प्रयत्न करावा, सर्व देवांची सारखीच स्तुति करावी ( कोणत्याहि धर्मपंथाचा आत्यंतिक कैवारी बनूं

नये हा अभिप्राय ), दुसऱ्यानें आपल्या काव्यावर आक्षेप घेतला किंवा टीका केली तरी तें सगळें सहन करावें, मनाचें गांभीर्य कायम ठेवावें. मन कधीं विकारवश होऊं देऊं नये.

**अविकत्थनतादैन्यं परेषां नष्टयोजनम् ।**
**पराभिप्रायकथनं परसादृश्यभाषणम् ॥ २० ॥**

**भावार्थ**—आत्मप्रशंसा करूं नये, तसेंच दीनताहि धारण करूं नये. दुसऱ्यांच्या अपूर्ण ( नष्टप्राय ) काव्यरचना पूर्ण कराव्यात, दुसऱ्याचा अभिप्राय समजून सांगावा आणि दुसऱ्यास अनुरूप असें भाषण करावें.

**सप्रसादपदन्यासः ससंवादार्थसंगतिः ।**
**निर्विरोधरसव्यक्तिः युक्तिर्व्याससमासयोः ॥ २१ ॥**

**भावार्थ**—प्रसादपूर्ण शब्दांची रचना करावी, संदर्भाशीं सुसंवादी अशा अर्थांची गुंफण करावी, (वर्ण्य विषयास) अविरोधी ( म्हणजे अनुरूप) अशा रसाची अभिव्यक्ति साधावी व गरजेनुसार संक्षिप्त वा विस्तृत रचनांची योजना करावी. ( गरजेनुसार संक्षेपविस्तार करावा. )

**प्रारब्धकाव्यनिर्वाहः प्रवाहश्चतुरो गिराम् ।**
**शिक्षाणां शतं इति उक्तं युक्तं प्राप्तगिरः कवेः ॥ २२ ॥**

**भावार्थ**—प्रारंभिलेलें काव्य शेवटपर्यंत रचून पूर्ण करावें. वाक्चातुरी प्रकट करावी. ज्यानें वाणीवर प्रभुत्व मिळविलें आहे अशा कवीला अनुरूप असा 'शतोपदेश' येथें केला आहे. ( शतप्रकार शिक्षणक्रमाचें वर्णन केलें आहे. )

**इति बहुतरशिक्षालक्षणक्षीणदोषे**
**प्रभवति गतनिद्रे प्रातिभे सुप्रभाते ।**
**कविरविरविलुप्तव्याप्तिभिः सूक्तपादै-**
**र्नयति नवनवत्वं भावभावस्वभावम् ॥ २३ ॥**

**भावार्थ**—अशाप्रकारें अनेकविध शिक्षणक्रमानंतर, ज्यांचीं लक्षणें पुढें सांगितलीं जाणार आहेत असे दोष क्षीण झाल्यावर ( पक्षीं दोषा म्हणजे रात्र सरल्यावर ), झोंप उडाल्यावर, पहांटेच्या वेळीं प्रतिभा ताजीतवानी असतांना कवि व्यापकपणा न गमावलेल्या आपल्या श्लोकाच्या चतुर्थांशांनीं, ( पक्षीं सूर्य आपल्या व्यापक किरणांनीं ), प्राणिमात्रांच्या रति, हास इत्यादि भावांची स्वाभाविक स्थिति ( पक्षीं पदार्थांचा सत्तास्वभाव ) अभिनवसुंदरपणें वर्णन करण्यास ( पक्षीं आपल्या अभिनव किरणांनीं प्रकट करण्यास ) समर्थ ठरतो.

इति श्रीव्यासदासापराख्यक्षेमेन्द्रकृते कविकंठाभरणे
(प्राप्तगिरः कवेः शिक्षाकथनं) द्वितीयः सन्धिः ॥

**भावार्थ**—अशा प्रकारें व्यासदास हें दुसरें नांव धारण करणाऱ्या क्षेमेन्द्रानें लिहिलेल्या कविकंठाभरण नामक ग्रंथांतील 'वाणीवर प्रभुत्व मिळविलेल्यांनीं घ्यावयाचें शिक्षण' निरूपणारा दुसरा सन्धि समाप्त झाला.

**संक्षिप्त विवरण**–क्षेमेन्द्रानें केलेल्या छायोपजीवी इत्यादि कवि-वर्गीकरणांत त्याच्या विचारांचा गणिती रेखीवपणा दिसून येतो. त्यानें इतर कवींच्या काव्यादींचें बुद्धिमंतास साजेशा सूक्ष्म दृष्टीनें, शास्त्रज्ञास साजेशा चिकित्सकपणें पण त्याच वेळीं रसिकास साजेशा रसिकतेनें वाचन केल्याचें, त्यानें दिलेल्या उदाहरणांवरून जाणवतें. त्यानें उद्धृत केलेलीं पद्यें प्रकृत मुद्याला लागू पडणारीं असून शिवाय अर्थदृष्ट्याहि रमणीय आहेत. एकंदरीनें त्याच्या विस्तृत वाचनाचा चांगलाच परिचय होता. ग्रंथरचनेचा पद्धतशीरपणा वाखाणण्यासारखा आहे. क्षेमेन्द्र प्रथम उपजीव्य कवीचा श्लोक देऊन मग उपजीवी कवीचा श्लोक उद्धृत करतो. अशा प्रकारें विषयचर्चा परिपूर्ण व सुस्पष्ट करतो. होतकरू कवींना त्यानें केलेला 'शतोपदेश' सर्वांगीण आहे. श्लोकांक ६, ७, ८, १०, १२

इत्यादींवरून 'काव्यांतील वास्तव' ह्या विषयावरील क्षेमेन्द्राच्या विचारांचा बोध होतो. क्षेमेन्द्रकालीं कविगोष्ठी, जनसंघ ( आजचा जनसंघ नव्हे ! ) इत्यादि सामाजिक संस्था अस्तित्वांत होत्या, तसेंच नाटकांचे प्रयोग होत असत ( श्लोक ५ ) आणि हस्तलिखित नियतकालिकांची प्रथा प्रचलित होती, असें श्लोकांक १०, ११, १६ इत्यादींवरून वाटतें. क्षेमेन्द्राच्या मतीं श्रोता हें काव्यनिर्णयाचें 'सुप्रीम कोर्ट' होय ( श्लोक १५ ). श्लोक १९ वरून टीकाकारांची जमात क्षेमेन्द्राहूनहि 'पुराणी' दिसते !

## तृतीयः सन्धिः ।

अथ शिक्षितस्य कवेः सूक्तिचमत्कारं आह—

**सुकविः अतिशयार्थी वाक्चमत्कारलोभा-**
**द्भिसरति मनोज्ञे वस्तुशब्दार्थसार्थे ।**
**भ्रमर इव वसन्ते पुष्पकान्ते वनान्ते**
**नवकुसुमविशेषामोदमास्वादलोलः ॥ १ ॥**

**भावार्थ**—आतां शिक्षण संपादिलेल्या कवीनें आपल्या काव्यांत चमत्कार कसा साधावयाचा तें सांगतात—

ज्याप्रमाणें वसन्त ऋतूंत नुकत्याच उगवलेल्या पुष्पविशेषांच्या सुगंधाचा आस्वाद घेण्यास पर्युत्सुक झालेला भ्रमर ( भुंगा ) फुलांनीं रमणीय झालेल्या उद्यानाकडे धांव घेतो त्याप्रमाणें काव्यांत सौंदर्यातिशय उत्पन्न व्हावा असें इच्छिणारा सत्कवि वाणीच्या चमत्काराच्या लोभामुळें ( वाक्चमत्काराला लोभावून ) जिच्यांतील विषय ( वस्तु ), शब्द व अर्थ हीं तिन्ही मनोरम आहेत अशा काव्यरचनेचा पाठपुरावा करतो.

नहि चमत्कारविरहितस्य कवेः कवित्वं, काव्यस्य वा काव्यत्वम् ।

**एकेन केनचिद् अनर्घमणिप्रभेण**
**काव्यं चमत्कृतिपदेन विना सुवर्णम् ।**
**निर्दोषलेशमपि रोहति कस्य चित्ते**
**लावण्यहीनमिव यौवनमङ्गनानाम् ॥ २ ॥**

**भावार्थ**—चमत्काररहित कवीचें कवित्व कवित्व ठरत नाहीं, किंवा चमत्काररहित काव्याला काव्यपदवी प्राप्त होत नाहीं.

तरुणींचें लावण्यरहित तारुण्य कोणाचें चित्त आकृष्ट करतें ? तद्वत् सुंदर वर्णांनीं गुंफिलेलें व लवमात्र दोष नसलेलें काव्य जर

चमत्कृतिपर शब्दांनीं रहित असेल तर तें कोणाचें मन भुलवील? सुवर्णहि मौल्यवान रत्नाच्या तेजानेंच आकर्षक बनतें. ( काव्यांत श्रुति-सुभग वर्णरचना व निर्दोष पदविन्यास असूनहि तें हृदयावर्जक ठरत नाहीं. त्यांत चमत्कृति असणें अनिवार्य आहे ही भूमिका. )

चमत्कारविरहो यथा मालवरुद्रस्य—

**वेल्लत्पल्लव सम्मिलल्लत लसत्पुष्प स्फुटत्कुड्मल**
**स्फूर्जद्गुच्छभर क्वणन्मधुकरक्रीडाविनोदाकर।**
**रक्ताशोक सखे! दयां कुरु हर प्रारब्धमाडम्बरं**
**प्राणाः कण्ठमुपागताः प्रियतमो दूरे त्वमेवंविधः॥**

चमत्काराचा अभाव; उदाहरणार्थ, मालवरुद्राचा पुढील श्लोक—

हे मित्रा ! तांबड्या अशोक वृक्षा ! तुझीं पानें सळसळत आहेत, वेली तुला दृढालिंगन देत आहेत, तुझीं फुलें तेजस्वी दिसत आहेत, कळे उमलत आहेत, फुलांचे गुच्छ शोभून दिसत आहेत, असा तूं म्हणजे गुणगुणणाऱ्या भुंग्यांच्या क्रीडानंदाचें निधान आहेस. मित्रा ! कृपा कर नि ही आपली समृद्धि आवरती घे. प्राण कंठाशीं आले आहेत (कारण) प्रियकर दूरदेशीं आहे आणि तूं असें ( उन्मादक ) रूप धारण केलें आहेस.

चमत्कारो यथा कालिदासस्य—

**रक्तस्त्वं नवपल्लवैरहमपि श्लाघ्यैः प्रियाया गुणै-**
**स्त्वामायान्ति शिलीमुखाः स्मरधनुर्मुक्ताः सखे! मामपि।**
**कान्तापादतलाहतिस्तव मुदे तद्वन्ममाप्यावयोः**
**सर्वं तुल्यमशोक! केवलमहं धात्रा सशोकः कृतः॥**

**भावार्थ**—काव्यांतील चमत्कारासाठीं कालिदासाचा पुढील श्लोक पाहा—

नव्या पालवीमुळें तूं तांबडा झाला आहेस, मीहि प्रियेच्या स्पृहणीय गुणांमुळें तिजवर अनुरक्त झालों आहें, तुजकडे भुंगे येतात आणि मित्रा!

मजकडेहि कामदेवाच्या धनुष्यांतून सुटलेले बाण येतात. रमणीच्या पायाच्या तळव्याचा प्रहार तुझ्या आनंदास कारणीभूत होतो, तसाच तो माझ्याहि होतो, आपल्या दोघांचें सर्व कांहीं सारखें आहे. पण मित्रा अशोका ! विधात्यानें केवळ मला सशोक ( दुःखी ) केलें आहे; तूं बरीक अशोक आहेस.

तत्र दशविधश्चमत्कारः—१. अविचारितमणीयः, २. विचार्यमाण-रमणीयः, ३. समस्तसूक्तव्यापी, ४. सूक्तैकदेशदृश्यः, ५. शब्दगतः, ६. अर्थगतः, ७. शब्दार्थगतः, ८. अलङ्कारगतः, ९. रसगतः, १०. प्रख्यात-वृत्तिगतश्च ।

**भावार्थ**—हा काव्यगत चमत्कार दहा प्रकारचा आहे—१. विचार न करावा लागतां प्रतीत होणारा, २. खास विचार केल्यावर प्रतीत होणारा, ३. समग्र काव्याला व्यापून असणारा, ४. काव्याच्या एका भागांत आढळणारा, ५. शब्दांत असणारा, ६. अर्थांत असणारा, ७. शब्द व अर्थ ह्या दोहोंत असणारा, ८. अलंकारांत असणारा, ९. रसांत असणारा व १०. प्रख्यात व्यक्तीच्या चरित्राश्रय कथेंत असणारा.

अविचारितरमणीयो यथा मम शशिवंशे—

**शूराः सन्ति सहस्रशः सुचरितैः पूर्णं जगत्पण्डितैः**
**संख्या नास्ति कलावतां बहुतरैः शान्तैः वनान्ताः श्रिताः।**
**त्यक्तुं यः किल वित्तं उत्तममतिः शक्नोति जीवाधिकं**
**सोऽस्मिन् भूमिविभूषणं शुभनिधिः भव्यो भवे दुर्लभः ॥**

**भावार्थ**—विचार न करावा लागतां प्रतीत होणारा चमत्कार. उदाहरणार्थ माझ्या शशिवंश काव्यांतील पुढील श्लोक—

हजारों शूरवीर आहेत, चारित्र्यसंपन्न विद्वानांनीं जग पूर्ण आहे, कलावंत असंख्य आहेत, अनेक यतींनीं अरण्याचा आश्रय घेतला आहे. परंतु, आपल्या जीवाहून अधिक प्रिय असणाऱ्या धनाचा त्याग करूं

शकणारा उत्तम बुद्धीचा, पृथ्वीला ललामभूत होणारा, पुण्यांचा संचय असलेला असा एखादा धन्य पुरुष ह्या जगांत दुर्लभ आहे.

विचार्यमाणरमणीयो यथा मम पद्यकादम्बर्याम्—

**अङ्गेऽनङ्गज्वरहुतवहश्चक्षुषि ध्यानमुद्रा**
**कण्ठे जीवः करकिसलये दीर्घशायी कपोलः।**
**अंसे वीणा कुचपरिसरे चन्दनं वाचि मौनं**
**तस्याः सर्वं स्थितमिति न तु त्वां विना कापि चेतः॥**

**भावार्थ**—विशेष विचार केला असतां प्रतीत होणारा चमत्कार माझ्या पद्यकादंबरींतील पुढील श्लोकांत आढळतो.

तिच्या अवयवांत कामाग्नीचा ताप आहे, नेत्रांत ध्यानमुद्रा आहे, कंठांत जीव आहे, अंकुरासारख्या ( सुकोमल ) हातावर गाल दीर्घकाळपर्यंत विश्रान्त झाला आहे, खांद्यावर वीणा आहे, वक्षःस्थळावर चन्दनाचा लेप आहे, वाणींत मौन आहे. अशाप्रकारें तिचें सर्व कांहीं स्तब्ध ( स्थिर ) आहे. पण तिचें चित्त मात्र तसें नाहीं. तुझ्या विरहामुळें तें अस्थिर आहे.

समस्तसूक्तव्यापी यथा मम शशिवंशे—

**माधुर्यानुभवेऽपि ते सुवदने तीक्ष्णाः कटाक्षाः परं**
**पर्यन्तस्थिततारका अपि नृणां रागानुबन्धोद्यताः।**
**नैवोज्झन्ति विवेकिनश्चपलतामुत्सेकसंवादिनी-**
**माश्चर्यं श्रवणौ स्पृशन्ति च पुनर्मारं च कुर्वन्त्यमी॥**

**भावार्थ**—समग्र काव्याला व्यापून असणारा चमत्कार माझ्या शशिवंश काव्यांतील पुढील श्लोकांत आढळेल—

हे सुन्दरी! तुझ्या कटाक्षांत जरी माधुर्याचा अनुभव येत असला तरी ते अत्यंत तीक्ष्ण आहेत. तुझ्या नेत्रांतील बुबुळें जरी नेत्रांच्या कोपऱ्यांत स्थिरावत असलीं तरी तीं पुरुषांना अनुरागानें बद्ध

करावयास उद्युक्त आहेत. विवेकी असूनहि तीं आपली अभिमानानुरूप चंचलता टाकीत नाहींत. आणि काय आश्चर्य पाहा ! कानांना स्पर्श करतात आणि प्रणयभाव निर्माण करतात !

सूक्तैकदेशदृश्यः यथा मम पद्यकादम्बर्याम्—

**नित्यार्चा हृदयस्थितस्य भवतः पद्मोत्पलैश्चन्दनै-**
**स्त्वद्भक्तिस्त्वदनुस्मृतिश्च मनसि त्वन्नाममन्त्रे जपः ।**
**सर्वत्रैव घनानुबन्धकलना त्वद्भावना सुभ्रुव-**
**स्तस्या जीवविमुक्तिरेव दिवसैर्देव ! त्वदाराधनात् ॥**

**भावार्थ**—काव्याच्या एका भागांत आढळणारा चमत्कार माझ्या पद्यकादंबरींतील पुढील श्लोकांत आढळेल—

रक्तकमळें, नीलकमळें व चंदन यांनीं हृदयस्थ तुझी नित्य पूजा-अर्चा, तुझी भक्ति, तुझें अनुस्मरण, मनांत तुझ्या नांवाचा सतत जप, अशी सर्वत्रच तुझ्याविषयींची गाढ भक्ति व श्रद्धाभावना आहे. ईश्वरा ! त्या सुंदर भुवयांच्या स्त्रीनें तुझी ही जी आराधना चालवली आहे तिच्या-मुळें थोड्याच दिवसांत ह्या जन्मींच तिला मोक्ष लाभेल.

शब्दगतो यथा मम चित्रभारतनाटके—

**इतश्चञ्चच्चूतच्युतमधुचया वान्ति चतुराः**
**समीराः सन्तोषं दिशि दिशि दिशन्तो मधुलिहाम् ।**
**निशान्ते कान्तानां स्मरसमरकेलिश्रममुषो**
**विजृम्भन्ते जृम्भाकलितकमलामोदसुहृदः ॥**

**भावार्थ**—शब्दांत असणारा चमत्कार माझ्या चित्रभारत नाटकां-तील पुढील श्लोकांत आढळेल—

रसाळ आंब्यांमधून स्रवणाऱ्या मधानें युक्त असे सुंदर वारे मधु-करांना ( म्हणजे भुंग्यांना ) आनंद देत सर्व दिशांत येथून वाहतात. विकसित कमलांच्या सुगंधाचे स्नेही असे ते रात्रीच्या शेवटीं प्रियकरांच्या कामक्रीडांतील श्रमांचा अपहार करून पुष्ट होतात.

अर्थगतो यथा मम लावण्यवत्याम्—

**सदासक्तं शैत्यं विमलजलधारापरिचितं**
**घनोल्लासः क्ष्माभृत्पृथुकटकपाती वहति यः ।**
**विधत्ते शौर्यश्रीश्रवणनवनीलोत्पलरुचिः**
**स चित्रं शत्रूणां ज्वलदनलतापं भवदसिः ॥**

**भावार्थ**—अर्थांत असणारा चमत्कार लावण्यवती नामक माझ्या काव्यांतील पुढील श्लोकांत आढळेल—

अतिशय तळपणारी व शत्रुराजांच्या प्रचंड सैन्यांचा निःपात करणारी अशी जी तुझी तरवार निर्मळ जलधारांनीं वृद्धिंगत केलेली शीतलता नेहमीं धारण करते तीच, शौर्यश्रीच्या कानांतील नवनील-कमलांचा वर्ण धारण करणारी तुझी तरवार तुझ्या शत्रूंना ज्वलंत अग्नीचा ताप देते, हें विचित्र नव्हे काय ?

शब्दार्थगतो यथा मम पद्यकादम्बर्याम्—

**किञ्चित्कुञ्चितकामकार्मुकलतामैत्री विचित्रा भ्रुवो-**
**र्नर्मोक्तिः स्मितकान्तिभिः कुसुमिता प्रागल्भ्यगर्भा गिरः ।**
**रागोत्सङ्गनिषङ्गिभिः सरसतासंवादिभिर्विभ्रमै-**
**रायुष्यं परमं तया रतिपतेः प्राप्तं मृगाक्ष्या वयः ॥**

**भावार्थ**—शब्द व अर्थ या दोहोंत दिसणारा चमत्कार माझ्या पद्यकादंबरींतील पुढील श्लोकांत आढळेल—

जिच्या, किंचित् वक्र असलेल्या, मदनाच्या धनुष्यलतेसारख्या अशा भुंवयांच्या हालचाली मोहक आहेत, जिच्या नर्म उक्ति स्मिताच्या कांतिमत्तेनें फुललेल्या आहेत, जिचें बोलणें प्रगल्भतापूर्ण आहे, जिचे उत्कट प्रेमानुरूप विभ्रम अनुरागासक्त आहेत, अशा त्या हरिणाक्षीनें ( सुंदरीनें ) रतिपतीसाठीं दीर्घ आयुष्य प्राप्त करून घेतलें आहे.

अलंकारगतो यथा मम लावण्यवत्याम्—

**स्तनौ स्तब्धौ तीक्ष्णं नयनयुगलं निम्नमुदरं**
**भ्रुवोर्वक्रा वृत्तिर्विहितमुनिमारोऽधरमणिः ।**
**तथासन्ने दैवाद्दियति विषमे दुर्जनगणे**
**गुणी मध्ये हारः स्पृशति तव दोलातरलताम् ॥**

**भावार्थ**—अलंकारांत असणारा चमत्कार माझ्या लावण्यवती नामक काव्यांतील पुढील श्लोकांत आढळेल—

स्तन कठीण ( वा क्रूर ) आहेत, नेत्रद्वय तीक्ष्ण ( किंवा निर्दय ) आहे, उदर खोल ( वा अधम ) आहे, भुंवया वक्र ( किंवा वंचक ) आहेत, अधररत्न यतींचाहि विनाश करणारें आहे. दुर्दैवानें इतक्या विषम दुर्जनांच्या मेळाव्यांत असणारा गुणी ( दोऱ्यांत सुंदर रीतीनें ओवलेला ) हार तुझ्या हिंदोळ्याच्या तरलतेस स्पर्श करतो ( तरलतेचा विषय होतो. )

रसगतो यथा मम कनकजानक्याम्—

**अत्रार्यः खरदूषणत्रिशिरसां नादानुबन्धोद्यमे**
**रुन्धाने भुवनं त्वया चकितया योद्धा निरुध्दः क्षणम् ।**
**सस्नेहाः सरसाः सहासरभसाः सभ्रूभ्रमाः सस्पृहाः**
**सोत्साहास्त्वयि तद्बले च निदधे दोलायमाना दृशः ॥**

**भावार्थ**—रसांत असणारा चमत्कार, उदाहरणार्थ, माझ्या कनकजानकी काव्यांतील पुढील श्लोकांत आढळेल—

येथें खर, दूषण व त्रिशिरस् यांचा वध केला जात असतांना होणारा आवाज जेव्हां जग व्यापून राहिला होता तेव्हां चकित झालेल्या तूं योद्धयाला क्षणभर मागल्यामागें थोपवून धरलेंस. त्यानें तुजवर तसेंच त्या सैन्यावर स्नेहभरे, प्रेमपूर्ण, हास्यानें चमकणारे, भुवयांच्या विभ्रमांनीं युक्त, स्पृहायुक्त, उत्साहपूर्ण व चंचल दृष्टिकटाक्ष फेकले.

प्रख्यातवृत्तिगतो यथा मम शशिवंशे—

अग्रं गच्छत यच्छत स्वपृतनां व्यूहक्षितिं रक्षत
क्षोणीं पश्यत नश्यत द्रुततरं मा मा स्थितिं मुञ्चत ।
यत्नात्तिष्ठत पृष्ठतस्तनुभिदामुग्रा गतिः पत्रिणा—
मित्यासीज्जनभञ्जने रथपथे पार्थस्य पृथ्वी श्रुतिः ॥

**भावार्थ**—प्रख्यात व्यक्तीच्या चरित्रावर आधारलेल्या कथानकांत असणारा चमत्कार माझ्या शशिवंश नामक काव्यांतील पुढील श्लोकांत आढळतो—

'पुढें सरका', 'आपल्या सैन्याला आवरा', 'व्यूहभूमीचें रक्षण करा', 'सैन्याच्या हालचालींवर देखरेख ठेवा', 'लवकर पळ काढा', 'आपापल्या जागा सोडूं नका', 'प्रयत्नपूर्वक उभे राहा', 'पाठीमागून येणाऱ्या व शरीर छिन्नभिन्न करून टाकणाऱ्या बाणांची गति जबरदस्त आहे,' असा अनेकविध कोलाहल, अर्जुनानें जेव्हां रणांगणांवर शत्रुपक्षाची दाणादाण उडविली, तेव्हां ऐकूं आला. ( रथारूढ अर्जुनानें लोकांचा असा आरडाओरडा ऐकला. )

इत्युक्तः एष सविशेषचमत्कृतीनां
सारः प्रकारपरभागविभाव्यमानः ।
कर्पूरवेध इव वाङ्मधुगन्धयुक्ते-
श्चैत्रासवस्य सहकाररसाधिवासः ॥ ३ ॥

**भावार्थ**—अशाप्रकारें वैशिष्ट्यपूर्ण चमत्कारांचें हें सार येथें सांगितलें आहे. तें योग्य प्रभेदांमुळें व ( तर्कनिष्ठ ) विभागांमुळें विशेषच खुलून दिसणारें आहे. तें वाणीरूप मद्याच्या सुगंधानें युक्त अशा कापरासारखें किंवा चैत्रांतील ( वसंत ऋतूंतील ) आसवाशीं आंब्यांच्या रसाचें मिश्रण साधल्यासारखें आहे.

**इति श्रीव्यासदासापराख्यक्षेमेन्द्रकृते कविकण्ठाभरणे चमत्कारकथनं तृतीयः सन्धिः ।**

**भावार्थ**—अशा प्रकारें व्यासदास हे दुसरें नांव धारण करणाऱ्या क्षेमेन्द्रानें लिहिलेल्या कविकंठाभरण नामक ग्रंथांतील चमत्काराचें निरूपण करणारा तिसरा सन्धि समाप्त झाला.

**संक्षिप्त विवरण**—काव्यांतील शब्द, अर्थ तसेंच काव्याचा वर्ण्य-विषय ह्या सगळ्याच गोष्टी मनोरम पाहिजेत, ह्यावर क्षेमेन्द्राचा कटाक्ष दिसतो. ( श्लोक पहिला ). शास्त्रचर्चा रमणीय उपमादींच्या साह्यानें सुगम व काव्यमय करण्याची त्याची जी हातोटी औचित्यविचारचर्चेंत लक्षित होते, ती ह्या संधींतील पहिल्या दोन श्लोकांतहि आढळून येते. काव्यांत चमत्कार असणें अत्यावश्यक आहे, किंबहुना चमत्कारावांचून काव्य नाहीं व ज्यास चमत्कार उत्पन्न करतां येत नाहीं तो कवि नाहीं, ही त्याची ठाम धारणा आहे व ती तो या संधींत तितक्याच ठामपणें मांडतो. त्यावरून त्यानें आपलीं मतें विचारपूर्वक बनवलेलीं असून त्यांविषयीं त्याचे ठायीं आग्रहबुद्धि आहे, हें स्पष्ट होतें. चमत्काराचें दशविध वर्गीकरण करणारा आद्य साहित्यशास्त्रज्ञ क्षेमेन्द्रच. हे चमत्कार सविशेष असून त्यांचें विभाजन तर्कनिष्ठ आहे असा त्याचा दावा आहे ( श्लोक ३. ) क्षेमेन्द्र औचित्यविचारचर्चेंत ज्याप्रमाणें शब्दगत, अर्थगत, अलंकारगत, रसगत, विषयगत इत्यादि औचित्यांचें विवेचन करतो त्याप्रमाणें येथें शब्दगत, अर्थगत इत्यादि चमत्कारांचें निरूपण करतो. ह्या संधीचें आणखी एक वैशिष्ट्य जाणवतें तें असें कीं, दहाहि प्रकारच्या चमत्कारांचें स्पष्टीकरण करण्याठीं त्यानें स्वतःचींच पद्यें उदाहरणा-दाखल दिलीं आहेत. हा प्रकार पाहून असें वाटूं लागतें की, क्षेमेन्द्रानें आपलीं काव्यें स्वतःला मान्य असलेले साहित्यशास्त्रविषयक सिद्धान्त डोळ्यांसमोर ठेवून लिहिलीं असावींत.

# चतुर्थः सन्धिः ।

अथ गुणदोषविभाग :—

काव्यैकपात्रविलसद्गुणदोषदुग्ध-
पाथः समूहपृथगुद्धरणे विदग्धाः ।
जानन्ति कर्तुमभियुक्ततया विभागं
चन्द्रावदातमतयः कविराजहंसाः ॥१॥

**भावार्थ**—आतां गुण व दोष यांचे विभाग सांगतात—

ज्याप्रमाणें राजहंस पक्षी एकाच पात्रांत मिसळले गेलेले दूध व पाणी हे दोन पदार्थ एकमेकांपासून वेगळे करूं शकतो, त्याप्रमाणें चन्द्राप्रमाणें शुभ्र ( विमल, निर्मल ) बुद्धि लाभलेले व एकाच काव्यांत परस्परांत मिसळून गेलेले गुण व दोष एकमेकांपांसून वेगळे निवडून काढण्यांत कुशल असलेले श्रेष्ठ कवि, निरंतरच्या उद्योगामुळें, सत्काव्य असत्काव्यापासून वेगळें कसें करावयाचें तें जाणतात.

**तत्र शब्दवैमल्यं अर्थवैमल्यं रसवैमल्यं इति त्रयः काव्यगुणाः । शब्दकालुष्यं अर्थकालुष्यं रसकालुष्यं इति काव्यदोषाः । सगुणं निर्गुणं सदोषं निर्दोषं सगुणदोषं च काव्यम् ॥**

**भावार्थ**—शब्दांची विमलता ( शुद्धता ), अर्थाची विमलता व रसांची विमलता असे तीन काव्यगुण होत. शब्दांची कलुषितता ( सदोषता ), अर्थाची सदोषता व रसाची सदोषता असे तीन काव्यदोष होत. काव्य हें सगुण, निर्गुण, सदोष, निर्दोष व गुणदोषयुक्त असें असतें.

शब्दवैमल्यं यथा मम पद्यकादम्बर्याम्—

तत्कालोपनते वयस्यनिधने हा पुण्डरीकेति त-
न्मोहव्यंजनमश्मभंजनमलं जीवस्य सन्तर्जनम् ।
कुंजव्यापि कपिंजलेन करुणं निस्पन्दमाक्रन्दितं
येनाद्यापि च तैः स्मृतेन हरिणैः शष्पं परित्यज्यते ॥

**भावार्थ**—शब्दांची विमलता, उदाहरणार्थ, माझ्या पद्यकादंबरींतील ह्या श्लोकांत आढळेल—

तेव्हां ( त्या समयीं ) मित्राचें निधन झालें असतां, कपिंजलानें निःस्तब्ध होऊन, 'मित्रा पुंडरीका !' अशी करुण किंकाळी फोडली. त्याचा मोह व्यक्त करणारी, दगडहि दुभंगून टाकण्यास समर्थ असणारी, जीवन गदगदां हलवणारी व लतामंडपाला व्यापून राहणारी ती किंकाळी आठवतांच हरणें अजूनहि तोंडांत घेतलेला गवताचा कवळ टाकून देतात.

अर्थवैमल्यं यथा मम शशिवंशे—

स्निग्धश्यामलशाद्वले फलतरुच्छायानिपीतातपे
चञ्चद्वीचिचयोच्छलत्कलकले निःसङ्गगङ्गातटे ।
अन्योन्याभिमुखोपविष्टहरिणे स्वस्थैर्यदि स्थीयते
तत्का श्रीः किमकाण्डभंगुरसुखैर्मोहस्य दत्तोऽञ्जलिः ॥

**भावार्थ**—अर्थाची विमलता, उदाहरणार्थ, माझ्या शशिवंश नामक काव्यांतील ह्या श्लोकांत आढळेल—

त्या धनवैभवाचा काय उपयोग ? आकस्मिकपणें नाश पावणाऱ्या सुखांचा तरी काय उपयोग ? जर, स्निग्ध व सांवळ्या कुरणांनीं परिपूर्ण, फळांनी लगडलेल्या वृक्षांच्या छायेनें सूर्याची उष्णता पिऊन टाकणाऱ्या, उचंबळणाऱ्या लहरींच्या आवाजानें गजबजलेल्या व एकमेकांसमोर तोंडें करून बसलेल्या हरिणांच्या कळपांनीं युक्त, एकांतपूर्ण अशा गंगाकिनारीं

स्वतःच्या चित्तवृत्तींसह राहतां येत असेल तर मोहाला कायमचा नमस्कार असो !

रसवैमल्यं यथा मम पद्यकादम्बर्याम्—

**अथोद्ययौ बालसुहृत्स्मरस्य श्यामाधवः श्यामललक्ष्मभङ्ग्या ।**
**तारावधूलोचनचुम्बने वै लीलाविलीनाञ्जनबिन्दुरिन्दुः ॥**

**भावार्थ**—रसाची विमलता, उदाहरणार्थ, माझ्या पद्यकादंबरींतील ह्या श्लोकांत आढळेल—

त्यानंतर रात्रीचा पति व कामदेवाचा बालमित्र असा चन्द्र उगवला. चंद्रावरील श्यामल कलंक म्हणजे चंद्र आपल्या तारावधूच्या डोळ्याचें चुंबन घेत असतां लीलया पुसला गेलेला काजळाचा बिंदु होय.

शब्दकालुष्यं यथा भट्टश्रीशिवस्वामिनः—

**उत्खातप्रखरा सुखासुखसखी खड्गासिता खेलगा**
**वैश्रृङ्खल्यखलीकृताखिलखला खे खेटकैः ख्यापिता ।**
**खेटादुत्खनितुं निखर्वमनसां मौर्ख्यं मुखात्खक्खटं**
**निःसंख्यान्यनिखर्वसर्वमणिभूराख्यातु संख्यानि वः ॥**

**भावार्थ**—शब्दांची सदोषता, उदाहरणार्थ, भट्ट शिवस्वामीच्या ह्या श्लोकांत आढळेल—

जिच्यांतील तीक्ष्ण कांटेकुटे उपटून टाकले आहेत, जी सुख व दुःख यांत सखीप्रमाणें साथ देते, जी खड्गानें ( म्हणजे शौर्यानें ) मिळवली गेली आहे, जी वीरांची क्रीडाभूमि आहे, जिच्यावरील समस्त दुष्टांचा उच्छृङ्खलपणा नष्ट केला गेला आहे, जिची आकाशांतील देवता प्रशंसा करतात, जी गर्विष्ठांच्या मुखांतून बाहेर पडणाऱ्या अनावर मूर्खपणाचें उच्चाटन करते ती बहुरत्ना वसुंधरा तुमच्या असंख्य युद्धांची जाणीव करून देवो.

अर्थकालुष्यं यथा तस्यैव—

**पित्रापि त्रायते या न खलु खलधृताज्ञानमात्रापमात्रा**
**स्योनस्योनस्थितेर्भूरनुनयविरमद्दामपाशाप्यपाशा ।**

**वर्षावर्षाम्बुपातात्त्रुटिततृणवसत्यश्रियातां श्रियातां**
**सौरी सौरीष्टयाग्रे सरिदिह जनतां साऽनुवानां ऽनुवानाम् ॥**

**भावार्थ**—अर्थाची सदोषता, उदाहरणार्थ, त्याच्याच ( म्हणजे भट्ट-शिवस्वामीच्या ) ह्या श्लोकांत आढळेल—

जिच्या प्रभावामुळें यच्चयावत् खलांची दुर्बुद्धि पसार झाली, जी किरणांनीं युक्त सूर्यापासून उत्पन्न झाली, अनुनयामुळें ( बलरामाच्या ) दामपाशापासून जी मुक्त झाली, वर्षाऋतूंतील जलबिंदूंमुळें नष्ट झालेल्या गवताळ प्रदेशाच्या टोकापर्यंत जी जाऊन पोंचली आहे, अशी ही सूर्यकन्या यमुना नदी तिच्या पित्याकडूनहि रक्षिली जात नाहीं. ती, बलरामाला अभीष्ट अशा आपल्या ऐश्वर्याच्या द्वारें, तिची स्तुति करणाऱ्या समस्त जनांचें इहलोकीं रक्षण करो.

रसकालुष्यं यथा भट्टनारायणस्य वेणीसंहारे—

**भानुमत्या नकुलप्राणिस्वप्नदर्शने पाण्डवनकुलस्वैरसङ्गमेर्ष्या-सद्भावः चक्रवर्तिमहिष्याः सामान्यनीचवनितावत् ॥**

**भावार्थ**—रसाची कलुषितता ( सदोषता ), उदाहरणार्थ, भट्ट-नारायणाच्या वेणीसंहारांतील पुढील उक्तींत आढळेल—

[ वेणीसंहार, द्वितीय अंक ]

"ततोऽहं तस्यातिशयितदिव्यरूपिणो नकुलस्य दर्शनेन उत्सुका जाता हृतहृदया च ॥" असे उद्गार, स्वप्नांत नकुल ( म्हणजे मुंगूस ) ह्या प्राण्याचें दर्शन झालें असतां, भानुमतीसारख्या एका सम्राटाच्या पत्नीनें काढणें हें रसविघ्नकारक आहे. असे उद्गार एखाद्या सामान्य, अधम स्त्रीला शोभतात.

सगुणं यथा कालिदासस्य— [ मेघदूत, उत्तरमेघ ४१ ]

**श्यामास्वङ्गं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपातं**
**वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु केशान् ।**

**उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासा-**
**न्हन्तैकस्थं क्वचिदपि न ते चण्डि ! सादृश्यमस्ति ॥**

**भावार्थ**—'सगुण' काव्याचें उदाहरण म्हणून कालिदासाचा हा श्लोक पाहा—

तुझ्या शरीराचें सादृश्य मला प्रियंगुलतेचे ठायीं आढळतें, तुझ्या कटाक्षाचें सादृश्य चकित झालेल्या हरिणीच्या दृष्टीमध्यें आढळतें, तुझ्या मुखाची शोभा चंद्राचे ठिकाणीं आढळते, तुझे केस मोरांच्या पिसाऱ्यांत प्रतीत होतात, तुझ्या भुवयांच्या हालचाली नदीच्या लहानलहान लहरींचे ठायीं मी पाहतों. परंतु हे क्रुद्ध स्त्रिये ! तुझें सादृश्य एकाच वस्तूचे ठायीं असें कोठेंच आढळत नाहीं ! ( एवंच, तुझें सौंदर्य अनुपम आहे ).

निर्गुणं यथा चन्द्रकस्य—

**स्तनौ सुपीनौ कठिनौ ठिनौ ठिनौ कटिर्विशाला रभसा भसा भसा ।**
**मुखं च चन्द्रप्रतिमं तिमं तिमं अहो सुरूपा तरुणी रुणी रुणी ॥**

**भावार्थ**—'निर्गुण' काव्याचें उदाहरण चन्द्रकाच्या ह्या श्लोकांत मिळेल—

स्तन पुष्ट व कठिण आहेत. नितंब विशाल व पुष्ट आहेत. मुख चंद्रासारखें आहे. आहा ! ही तरुणी खरोखरीच सुस्वरूप आहे. ( मूळ श्लोकांत ठिनौ ठिनौ, भसा भसा इत्यादि शब्दांच्या साह्यानें जो अनुप्रास साधला आहे, तो निरर्थक आहे. वर्णांची ती आवृत्ति अर्थहीन असल्यामुळें हें काव्य निर्गुण आहे. )

सदोषं यथा भट्टश्रीशिवस्वामिनः—

**आद्यत्वावधि शिण्ढि शिण्ढि दृढतागूढानि गूढेतरां**
**प्रौढिं ढौकय पिण्ढि पिण्ढि च रुजं रूढापरूढां तया ।**
**मूढं मूढममूढयस्व हृदयं लीढ्वाथ मृढ्वा तमः**
**सोऽव्यूढामिति च प्रभा परिवृढाव्यूढा द्रढिम्नेऽस्तु वः ॥**

**भावार्थ**—'सदोष' काव्याचें उदाहरण भट्टशिवस्वामीच्या ह्या श्लोकांत आढळेल—

**भावार्थ**—दृढतेमुळें ( म्हणजे क्लिष्टतेमुळें ) गूढ ( म्हणजे दुर्बोध ) होणाऱ्या रचना ( करण्याचें ) टाळून गूढेतर ( म्हणजे सुबोध ) रचनांना जवळ कर. प्रकट-अप्रकट अशा दुःसह दोषरूप रोगांचें निर्मूलन कर. हृदयाचें मूर्खपण निवारून शहाणपण प्राप्त कर. अज्ञानाचा निरास करून ( मृद्वा तमः ) ज्ञानाचा आस्वाद घे ( लीढ्वाऽतमः ). असें केल्यानें विद्वानांना आजपावेतों मान्य असलेली ( प्रतिभारूपी ) प्रभा तुमच्या दृढतेस ( स्थिरकीर्तीस ) कारणीभूत होईल ( होवो. )

निर्दोषं यथा श्रीभीमसाहेः सान्धिविग्रहिकस्य इन्द्रभानोः—

**स्नातुं वाञ्छसि किं मुधैव धवलक्षीरोदफेनच्छटा-**
**छायाहारिणि वारिणि द्युसरितो दिक्पूरविस्तारिणि ।**
**आस्ते ते कलिकालकल्मषमषीप्रक्षालनैकक्षमा**
**कीर्तिः संनिहितैव सप्तभुवनस्वच्छन्दमन्दाकिनी ॥**

**भावार्थ**—'निर्दोष' काव्याचें उदाहरण श्रीभीमसाहि राजाच्या इन्द्रभानु नामक सान्धिविग्रहिकाच्या ( सलोखा वा वितुष्ट घडवून आणणारा परराष्ट्र-वकील ) ह्या श्लोकांत मिळेल.

सप्त भुवनांना स्वच्छन्दपणें व्यापणारी, कलिकालाच्या पापरूपी कलंकाचें क्षालन करण्यास समर्थ असलेली, तुझीच कीर्ति अशी मन्दाकिनी ( गंगानदी ) जवळच असतांना, धवल सागराच्या फेंसाचें सौंदर्य झांकणारें, दिशांचा यच्चयावत् विस्तार व्यापणारें पाणी असलेल्या स्वर्गंगेंत स्नान करण्याची इच्छा तूं उगीचच कां बाळगतेस ?

सगुणदोषं यथा भट्टमयूरस्य— [ सूर्यशतक १७ ]

**अस्तव्यस्तत्वशून्यो निजरुचिरनिशानश्वरः कर्तुमीशो**
**विश्वं वेश्मेव दीपः प्रतिहततिमिरं यः प्रदेशस्थितोऽपि ।**

दिक्कालापेक्षयाऽसौ त्रिभुवनमटतस्तिग्मभानोर्नवाख्यां
यातः शातक्रतव्यां दिशि दिशतु शिवं सोऽर्चिषां उद्गमो वः ॥

**भावार्थ**—गुण व दोष या दोहोंनीं युक्त काव्याचें उदाहरण भट्टमयूराच्या ह्या श्लोकांत आढळेल—

अस्ताच्या ( म्हणजे नाशाच्या ) व्यस्तत्वानें ( म्हणजे संकटानें ) शून्य ( म्हणजे रहित ) म्हणजे अविनाशी [ दिव्याकडे—स्तुत्यतत्र-निग्रत्व-रहित ], स्वतःच्या तेजानें रात्रीचा नाश करणारा [ दिव्याकडे—स्वतःचें तेज नसलेला व दिवसा नाश पावणारा ], घराच्या एकाच भागांत राहूनहि समस्त घरांतील अंधकार नष्ट करणाऱ्या दिव्याप्रमाणें एकाच दिशेंत राहूनहि समग्र विश्वांतील अंधकार नष्ट करण्यास समर्थ असलेला, दिशा व काल यांच्या अपेक्षेनें ज्ञात होणारा, तिन्ही लोक हिंडणाऱ्या सूर्याच्या किरणांचा तो उदय, नुकताच पूर्वदिशेस झाला असून तो तुम्हांला कल्याणदायक होवो.

इति गदितगुणार्थी त्यक्तनिर्दिष्टदोषः
कविरुचिरपदस्थश्चक्रवर्तित्वसिध्दै ।
किमपि कृतविवेकः साधुमध्याधमानां
नृप इव परिरक्षेत् संकरं वर्णवृत्तेः ॥

**भावार्थ**—ज्याप्रमाणें एखादा राजा, 'चक्रवर्ति' पद प्राप्त व्हावें ह्यासाठीं, उच्च, मध्यम व अधम अशा थरांतील लोकांमधील भेद विवेकपूर्वक लक्षांत घेऊन ( चार ) वर्ण व ( विविध ) व्यवसाय यांचा, ( संकरापासून ) बचाव करतो, त्याप्रमाणें कवीच्या दृष्टीनें उत्कृष्ट असें पद ( प्रतिष्ठा ) लाभलेल्या, उपर्युक्त गुणांची अपेक्षा बाळगणाऱ्या, उपरिनिर्दिष्ट दोषांचा त्याग करणाऱ्या कवीनें, कविचक्रवर्ती ह्या पदवीच्या प्राप्तीसाठीं, निर्दोष ( व सगुण ), गुणदोषयुक्त व केवळ सदोष अशा काव्यांत ( व कवींत ) विवेकपूर्वक तारतम्य करून काव्याचा, शब्द

व्यापाराच्या संकरापासून बचाव करावा. (क्षेमेन्द्र वाल्मीकि व व्यास यांना चक्रवर्ती कवि समजतो.)

**इति श्रीव्यासदासापराख्यक्षेमेन्द्रकृते कविकण्ठाभरणे गुणदोषविभागश्चतुर्थः सन्धिः।**

**भावार्थ**—अशा प्रकारें, व्यासदास हें दुसरें नांव धारण करणाऱ्या क्षेमेन्द्रानें लिहिलेल्या कविकंठाभरण नामक ग्रंथांतील गुण व दोष यांचे विभाग यांचें निरूपण करणारा चवथा सन्धि समाप्त झाला.

**संक्षिप्त विवरण**—ह्या संधीच्या पहिल्याच श्लोकांत क्षेमेन्द्रानें विमल बुद्धीच्या सत्कवींना नीरक्षीरविवेककुशल राजहंसांची जी उपमा दिली आहे ती अन्वर्थक व रमणीयहि आहे. काव्यांतील गुण, दोष, गुणदोषदृष्ट्या काव्यांचे प्रकार इत्यादि विषयांसंबंधीं क्षेमेन्द्राच्या कोणत्या कल्पना होत्या, तें या संधींत स्पष्ट झालें आहे. क्षेमेन्द्र शब्दांची निर्दोषता, अर्थाची निर्दोषता व रसाची निर्दोषता असे तीन काव्यगुण मानतो. येथील गुण शब्द उपादेय धर्म ह्या अर्थाचा आहे. तसेंच तो शब्दांची सदोषता, अर्थाची सदोषता व रसाची सदोषता असे तीन काव्यदोष मानतो. अर्थात्, येथील दोष शब्द हेयधर्माचा वाचक आहे. तीन काव्यगुण व तेवढेच काव्यदोष ही समता लक्षांत घेण्यासारखी आहे. त्रिप्रकारकवैमल्याचीं उदाहरणें तो स्वतःच्या काव्यांमधून देतो, कालुष्याचीं उदाहरणें मात्र इतरांच्या काव्यांतून देतो. औचित्यविचारचर्चेंत तो स्वतःचींच पद्यें उदाहृत करून त्यांतील औचित्यभंग निर्ममवृत्तीनें दाखवून देतो. या ग्रंथांत तो पंथ त्यानें स्वीकारलेला दिसत नाहीं. क्षेमेन्द्र हा पूर्णपणें वास्तववादी आहे, त्यामुळें काव्याचे गुणदोषनिष्ठ प्रकार सांगतांना तो सगुणदोष हा भेद आवर्जून सांगतो. तथापि, सदोष काव्याचा काव्यपदवीवर कसा हक्क पोंचतो त्याचा खुलासा तो करीत नाहीं. चक्रवर्ती कवि थोडेच असतात हें त्याचें म्हणणें योग्य आहे.

## पञ्चमः सन्धिः ।

अथ परिचयचारुत्वं आह—

**नहि परिचयहीनः केवले काव्यकष्टे**
**कुकविः अभिनिविष्टः स्पष्टशब्दप्रविष्टः ।**
**विबुधसदसि पृष्टः क्लिष्टधीर्वेत्ति वक्तुं**
**नव इव नगरान्तर्गह्वरे कोऽप्यधृष्टः ॥१॥**

**भावार्थ**—आतां (विविध शास्त्रांच्या) परिचयाचें सौंदर्य सांगतात—

ज्याप्रमाणें एखादा भित्रा मनुष्य पहिल्यांदाच मोठ्या शहरांत आला असतां तेथील रस्त्यांवरून हिंडतांना बावचळून जातो त्याप्रमाणें शास्त्रीय ज्ञान न मिळविलेला, अभिनिवेशी, उत्तान शब्दांनीं काव्यरचना करणारा व केवळ पद्यरचनेची हमाली करणारा एखादा कुकवि विद्वानांच्या (जाणकारांच्या) सभेंत बसला कीं नुसता गोंधळून जातो. त्याला विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देतां येत नाहींत. [ वरील उक्तीशीं, 'प्रायः कुकवयो लोके रागाधिष्ठितदृष्टयः । कोकिला इव जायन्ते वाचालाः कामकारिणः ॥' ही बाणोक्ति ( हर्षचरित १.४ ) तुलनीय आहे. ]

**तत्र तर्क-व्याकरण-भरत-चाणक्य-वात्स्यायन-भारत-रामायण-मोक्षोपायात्मज्ञान-धातुवाद-रत्नपरीक्षा-वैद्यक-ज्यौतिष-धनुर्वेद-गजतुरगपुरुष-लक्षण-द्यूतेन्द्रजालप्रकीर्णेषु परिचयः कविसाम्राज्य-व्यंजनः ॥**

**भावार्थ**—म्हणून तर्कशास्त्र, व्याकरण, भरताचें नाट्यशास्त्र, चाणक्याची राजनीति, वात्स्यायनाचें कामशास्त्र, महाभारत, रामायण, मोक्षप्राप्तीचे उपाय, अध्यात्मशास्त्र, धातुशास्त्र, रत्नपरीक्षाशास्त्र, वैद्यक-शास्त्र, ज्योतिःशास्त्र, धनुर्वेद, गजशास्त्र, अश्वशास्त्र, पुरुषलक्षणविद्या,

जुगाराची विद्या, जादूची विद्या, आणि संकीर्ण विषय यांचें सम्यक् ज्ञान कवीस कवींच्या मेळाव्यांत सम्राट्पद प्राप्त करून देतें. ( हें ज्ञान कवि-साम्राज्याचें सूचक आहे. )

तर्कपरिचयो यथा मम पद्यकादम्बर्याम्—

**यत्प्राप्यं मनोरथैर्न वचसा स्वप्नेऽपि दृश्यं न य-**
**त्तत्रापि स्मरविप्रलब्धमनसां लाभाभिमानग्रहः ।**
**मोहोत्प्रेक्षितशुक्तिकारजतवत्प्रायेण यूनां भ्रमं**
**दत्ते तैमिरिकद्विचन्द्रसदृशं खे नूनमाशाकृषिः ॥**

**भावार्थ**—तर्कशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या पद्यकादंबरींतील ह्या श्लोकांत दिसेल.

जें मनोरथांनाहि दुष्प्राप्य असतें, जें वाचेलाहि मिळण्यासारखें नसतें ( म्हणजे जें अवर्णनीय असतें ), जें स्वप्नांतहि दिसण्यासारखें नसतें त्याची प्राप्ति आपल्याला ( अवश्य ) होईल असा अभिमानमूलक ग्रह कामवंचित अंतःकरणांचा झालेला असतो. ज्याप्रमाणें शिंपला हा चांदीच्या तुकड्यासारखा असल्याचा भ्रम अज्ञानामुळें होतो किंवा, ज्याप्रमाणें दृष्टि-दोषामुळें आकाशांत दोन चन्द्र असल्याचा भ्रम होतो त्याप्रमाणें, खरो-खरच, आशारूपी शेतीचें पीक तरुणांच्या चित्तांत भ्रम उत्पन्न करतें.

व्याकरणपरिचयो यथा भट्टमुक्तिकलशस्य—

**द्विगुरपि सद्वन्द्वोऽहं गृहे च मे सततमव्ययीभावः ।**
**तत्पुरुष कर्मधारय येनाहं स्यां बहुव्रीहिः ॥**

**भावार्थ**—व्याकरणशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, भट्टमुक्तिकलशाच्या ह्या श्लोकांत आढळेल—

मजपाशीं दोन गाई आहेत. आम्ही पुरुष व स्त्री अशीं दोघें आहोंत. माझ्या गृहांत नेहमीं व्यय ( खर्च ) होत नाहीं. ( मजपाशीं व्यय करायला पैसा नाहीं. ) म्हणून, हे पुरुषा, ज्यायोगें माझ्या घरांत

धान्याची चंगळ होईल, असें कांहीं कृत्य तूं कर ( किंवा असा एखादा व्यवसाय मला सांग. ) ( या श्लोकांत द्विगु, द्वन्द्व इत्यादि सहा समासांचीं नांवें खुबीनें गुंफण्यांत आलीं आहेत. प्रस्तुत श्लोक सर्वत्र प्रसिद्ध आहे. )

भरतपरिचयो यथा भट्टश्रीशिवस्वामिनः—

**आतन्वन्सरसां स्वरूपरचनां आनन्दिबिन्दूदयम्**
**भावग्राहि शुभप्रवेशकगुणं गंभीरगर्भस्थिति ।**
**उच्चैर्वृत्ति सपुष्करव्यतिकरं संसारविष्कम्भकं**
**भिन्द्याद् वो भरतस्य भाषितमिव ध्वान्तं पयो यामुनम् ॥**

**भावार्थ**—भरताच्या नाट्यशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, भट्टश्रीशिवस्वामीच्या ह्या श्लोकांत आढळेल—

[ प्रस्तुत श्लोकांत भरताचें भाषित व यामुन पयस् यांची तुलना केलेली आहे. भाषांतर आकलनीय व्हावें ह्यासाठीं उपमेय व उपमान हीं दोन्ही पृथक् केलीं आहेत. ]

भरताच्या भाषितासारखें [ म्हणजे नाट्यशास्त्रासारखें ] असलेलें यमुना नदीचें पाणी तुमचें अज्ञान [ शब्दशः अंधकार ] नाहींसें करो. यमुना नदीचें पाणी भिन्न-भिन्न स्वरूपाकारांचीं सरोवरें निर्मितें. तें आल्हाददायक जलबिन्दूंचें बनलेलें असून हृदयांतील भावनांना संतोष देतें. तें बुडी मारणाऱ्यांना, स्वगुणसंपदेनें, आरोग्यदान करतें. तें खूप खोल असून खळखळां वाहतें व उचंबळतें. कमलांनीं युक्त असें तें परमपवित्र असल्यामुळें मोक्ष प्राप्त करून देतें. [ शब्दशः संसाराची निवृत्ति करतें. ]

भरताचें नाट्यशास्त्र शृंगारादि रसांनी युक्त अशा विविध स्वरूपाच्या नाट्यरचनांचें विवरण करतें. बिन्दु नामक अतिशय आनंददायक नाटकांगांचा त्यांत परिचय करून दिलेला असून तें रत्यादि भावांचें ग्रहण करतें. त्यांत प्रवेशक नामक सुंदर नाट्यविभागांचें गुणवर्णन केलेलें असून 'गर्भसन्धि' नांवाच्या गंभीर नाट्यावस्थांचें निरूपण केलेलें असतें.

उच्च शैलीच्या प्रदर्शनानें युक्त असें तें पुष्करवाद्यादींशीं संबद्ध असून काव्यानंदाच्या दानानें संसारतापांची निवृत्ति करतें.

चाणक्यपरिचयो यथा मम पद्यकादंबर्याम्—

**स्वामी प्रमादेन मदेन मन्त्री कोपेन राष्ट्रं व्यसनेन कोषः।**
**छिद्रेण दुर्गं विषमेण सैन्यं लोभेन मित्रं क्षयं एति राज्ञाम् ॥**

**भावार्थ**— चाणक्याच्या राजनीतीचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या पद्यकादंबरींतील पुढील श्लोकांत आढळेल—

राजाचा नाश चुकीच्या वर्तनानें होतो, मंत्र्याचा उद्धटपणामुळें (होतो), राष्ट्राचा कोपानें (होतो), धनवैभवाचा व्यसनाधीनतेनें (होतो), किल्ल्याचा खिंडारामुळें (होतो), सैन्याचा अनियमितपणामुळें (होतो) व मित्राचा लोभानें (होतो).

वात्स्यायनपरिचयो यथा भट्टदामोदरगुप्तस्य—

[ कुट्टनीमत श्लोकांक ४०३ ]

**अधरे बिंदुः, कण्ठे मणिमाला, कुचयुगं शशप्लुतकम् ।**
**तव सूचयन्ति सुन्दरि ! कुसुमायुधशास्त्रपण्डितं रमणम् ॥**

**भावार्थ**— वात्स्यायनाच्या कामशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, भट्टदामोदरगुप्ताच्या ह्या श्लोकांत आढळेल—

हे सुन्दरी ! तुझ्या खालच्या ओंठावरील दंतक्षत, गळ्यावरील अशा क्षतांची मालिका, आणि स्तनद्वयावरील नखक्षतें ह्या सर्व गोष्टी, कामशास्त्रांत प्रवीण असलेल्या प्रियकरानें, तुझा उपभोग घेतला असल्याचें सूचित करतात.

भारतपरिचयो यथा मम देशोपदेशे— [ देशोपदेश ४–५ ]

**भगदत्तप्रभावाढ्या कर्णशल्योत्कटस्वरा ।**
**सेनेव कुरुराजस्य कुट्टनी किन्तु निष्कृपा ॥**

**भावार्थ**— महाभारताचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या देशोपदेशांतील पुढील श्लोकांत दिसेल.

संपत्तीमुळें लाभलेल्या प्रभावानें युक्त आणि कानाचीं रंध्रें बाणाप्रमाणें जणूं छेदून जाणाऱ्या चढ्या (उंच) आवाजाची

कुंटीण, भगदत्ताच्या पराक्रमानें संपन्न व कर्णशल्यांच्या मोठ्या आवाजानें दुमदुमून गेलेल्या कुरुराजाच्या सैन्यासारखी आहे. पण दोहोंत एवढाच फरक आहे कीं, कुंटीण निर्दय ( निष्कृप ) आहे तर कौरवसेना कृपाचार्यसहित आहे.

रामायणपरिचयो यथा भट्टवाचस्पतेः—

**जनस्थाने भ्रान्तं कनकमृगतृष्णान्धितधिया**
**वचो वैदेहीति प्रतिपदमुदश्रु प्रलपितम् ।**
**कृतालंकाभर्तुर्वदनपरिपाटीषु घटना**
**मयाऽऽप्तं रामत्वं कुशलवसुता न त्वधिगता ॥**

**भावार्थः**—वाल्मीकींच्या रामायणाचें ज्ञान, उदाहरणार्थ, भट्टवाचस्पतीच्या ह्या श्लोकांत दिसेल.

सोन्याच्या मृगजळानें दृष्टि दिपून गेल्यामुळें मी 'दे दे' असें बरळत, पावलोपावलीं डोळ्यांतून टिपें गाळीत, शहरोशहरीं हिंडलों. माझा धनी दुःस्वभावी असूनहि त्याला सन्तुष्ट करण्यास मी काय करावयाचें बाकी ठेवलें ? पण तरीहि कल्याणप्रद धनवैभव कांहीं मला लाभलें नाहीं. मी ह्याबाबतींत रामाचें अनुकरण केलें. कारण, कांचनमृगाच्या प्राप्तीच्या इच्छेमुळें आंधळा झालेला रामहि ( रावणानें सीतेचें अपहरण केल्याचें कळतांच ) भ्रमिष्ट होत्साता, 'हे सीते ! हे सीते !' असा शोक करीत, डोळ्यांतून आंसवें गाळीत, जनस्थानामध्यें हिंडला. त्यानें लंकाधीश रावणाच्या मुखावर अनेक प्रहार केले आणि त्याला कुश व लव ह्या दोन पुत्रांची माता ( सीता ) गवसली. ( पण मला मात्र कुशलवसुता लाभली नाहीं; हा दोहोंतील फरक. )

मोक्षोपायपरिचयो यथा मम मुक्तावल्याम्—

**निरासंगा प्रीतिः विषयनियमोऽन्तर्न तु बहिः**
**स्वभावे भावानां क्षयजुषि विमर्शः प्रतिदिनम् ।**
**अयं संक्षेपेण क्षपिततमसामक्षयपदे**
**तपोदीक्षाक्षेपक्षपणनिरपेक्षः परिकरः ॥**

**भावार्थ**—मोक्षप्राप्तीच्या साधनांचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या मुक्तावलींतील ह्या श्लोकांत आढळेल—

निःसंग प्रेम, अन्तर्बाह्य इंद्रियनिग्रह, आणि पदार्थांच्या विनाशी स्वभावाविषयीं दररोज चिन्तन करणें, हा, ज्यांचें अज्ञान धुतलें गेलें आहे अशांनीं अक्षयपदाच्या प्राप्तीसाठीं करावयाच्या गोष्टींचा सारांश आहे. हा आचारसंक्षेप बौद्ध वा जैन साधूंना आचारावयास लागणाऱ्या तपश्चर्या, दीक्षा इत्यादि गोष्टींवर अवलंबून नाहीं.

आत्मज्ञानपरिचितिर्यथा मम चित्रभारतनाम्नि नाटके—

पृथुशास्त्रकथाकन्थारोमन्थेन वृथैव किम् ।
अन्वेष्टव्यं प्रयत्नेन तत्त्वज्ञैर्ज्योतिरान्तरम् ॥

भावार्थ—आत्मज्ञानाचा परिचय, उदाहरणार्थ, माझ्या चित्र-भारत नाटकांतील पुढील श्लोकांत होईल—

मोठमोठ्या शास्त्रांच्या चर्चेच्या कंथेचें चर्वितचर्वण व्यर्थच करीत राहण्यांत काय स्वारस्य आहे ? अन्तिम सत्य जाणूं इच्छिणाऱ्या विवेकी पुरुषांनीं अन्तःस्थ प्रकाशाचा प्रयत्नपूर्वक शोध घ्यावा.

धातुवादपरिचयो यथा राजशेखरस्य—

नखदलितहरिद्राग्रन्थिगौरे शरीरे
स्फुरति विरहजन्मा कोऽप्ययं पाण्डुभावः ।
बलवति सति यस्मिन्साधमावर्त्य हेम्ना
रजतमिव मृगाक्ष्या कल्पितान्यङ्गकानि ॥

भावार्थ— धातुशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, राजशेखराच्या ह्या श्लोकांत आढळेल—

नखांचे ओरखडे उठलेल्या व हळकुंडासारख्या पिवळ्या असलेल्या तिच्या शरीरावर विरहामुळे निर्माण झालेला फिकटपणा स्पष्टपणें दिसत आहे. तो फिकटपणा स्पष्टतर झाला असतां त्या हरिणाक्षीचे अवयव सोन्यांत चांदी मिसळल्यासारखे भासतात.

रत्नपरीक्षापरिचयो यथा भट्टमल्लटस्य—

दूर्विणं आपदि भूषणं उत्सवे शरणं आत्मभये निशि दीपकः ।
बहुविधाप्युपकारक्षमो भवति कोऽपि भवानिव सन्मणिः ॥

**भावार्थ**—रत्नें, हिरे, माणकें इत्यादि मौल्यवान् जडजवाहिराची पारख करण्याचें ज्ञान, उदाहरणार्थ भट्टमल्लटाच्या ह्या श्लोकांत दिसेल—

संकटकालीं द्रव्याप्रमाणें, सभासमारंभप्रसंगीं अलंकाराप्रमाणें, भीतीच्या प्रसंगीं आश्रयाप्रमाणें, रात्रींच्या वेळीं दिव्याप्रमाणें—एतावता नानाप्रकारें उपयोगीं पडणारा तुझ्यासारखा उत्कृष्ट मणि दुसरा क्वचितच असेल.

वैद्यकपरिचयो यथा मम पद्यकादम्बर्याम्—

**अंगं चंदनपंकपंकजबिसच्छेदावलीनं मुहु—**
**स्तापः शाप इवैष शोषणपटुः कम्पः सखीकम्पनः ।**
**श्वासाः संवृततारहाररुचयः संभिन्नचीनांशुका**
**जातः प्रागतिदाहवेदनमहारंभः स तस्या ज्वरः ॥**

**भावार्थ**—वैद्यकशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या पद्यकादंबरींतील पुढील श्लोकांत दिसेल.

( प्रणयाच्या ) तापामुळें तिचीं गात्रें, शापानें व्हावींत त्याप्रमाणें, शुष्क झालीं आहेत. शरीरावर चंदनाचा लेप लावला असून तें कमळाच्या केसरांनीं आच्छादिलें आहे. तिच्या शरीराची थरथर तिच्या मैत्रिणींच्या हृदयाचा थरकांप उडवीत आहे. तिचा श्वासोच्छ्वास तिच्या रेशमी वस्त्राला अडथळा करणाऱ्या चंचल हाराप्रमाणें अनियमित झाला आहे. ( तिचा कामताप ) सुरुवातीस दाह करणारा व मग अतिशय वेदना देणारा शारीरिक ताप होऊन बसला आहे.

ज्योतिःशास्त्रपरिचयो यथा विद्यानन्दस्य—

**द्यामालोकयतां कलाः कलयतां छायाः समाचिन्वतां**
**क्लेशः केवलमंगुलीर्गणयतां मौहूर्तिकानामयम् ।**
**धन्या सा रजनी तदेव सुदिनं पुण्यः स एव क्षणो**
**यत्राज्ञातचरः प्रियानयनयोः सीमानमेति प्रियः ॥**

**भावार्थ**—ग्रह, नक्षत्रें, तारे इत्यादींच्या गतिस्थितीच्या शास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, विद्यानन्दाच्या ह्या श्लोकांत आढळेल—

आकाशाचें अवलोकन करणें, कला मोजणें, छायांचीं मोजमापें करणें व बोटांवर दिवसांची गणना करणें हा ज्योतिर्विदांचा निरर्थक खटाटोप आहे. ती रात्र धन्य होय, तो दिवस शुभदिन होय आणि तोच क्षण खरा पुण्यप्रद होय, कीं जेव्हां लपत-छपत हिंडणारा प्रियकर प्रियेच्या टप्प्यांत येतो.

धनुर्वेदपरिचयो यथा मम कनकजानक्याम्—

**आर्यस्याम्बधनौघलाघववती सन्धानसम्बंधिनी**
**स्थाणुस्थानकसौष्ठवप्रणयिनी चित्रक्रियालङ्कृतिः ।**
**निष्पन्देन मयाऽतिविस्मयमयी सत्यस्थितप्रत्यया**
**संहारे खरदूषणत्रिशिरसामेषैव दृष्टा स्थितिः ॥**

**भावार्थ**—धनुर्विद्येचा परिचय, उदाहरणार्थ, माझ्या कनकजानकींतील ह्या श्लोकांत मिळेल.

खर, दूषण, त्रिशिरस् या दैत्यांचा आपण जेव्हां संहार केलांत तेव्हांच आपली ती अतिशय विस्मयोत्पादक अशी, लक्ष्यवेध करतांना उभें राहण्याची ढब मीं निःस्तब्धपणें पाहिली होती. ती ढब धनुर्धराच्या सौंदर्यानें युक्त, स्थाणुस्थानक ( ह्या शंकराच्या ढबीचें ) सौष्ठव असल्यामुळें चित्ताकर्षक, चित्रांत रेखल्यागत असलेली व सत्याप्रमाणें स्थिर प्रत्यय आणून देणारी होती.

गजलक्षणपरिचयो यथा मम कनकजानक्याम्—

**कर्णाभ्यर्णविकीर्णचामरमरुद्विस्तीर्णनिःश्वासवा-**
**न्छङ्खच्छत्रविराजिराज्यविभवद्वेषी विलीनेक्षणः ।**
**स्मृत्वा राघव ! कुंजरः प्रियतमामेकाकिनीं कानने**
**सन्त्यक्तां चिरमुक्तभोगकवलः क्लेशोष्मणा शुष्यति ॥**

**भावार्थ**—गजशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या कनकजानकींतील ह्या श्लोकांत दिसेल.

हे रघुपुत्रा ! ज्याचे दीर्घ निसासे कानांपाशीं हलणाऱ्या चवऱ्यांच्या वाऱ्यामुळें सर्वत्र पसरत आहेत, शंख व छत्र यांनीं जरी त्यास सुशोभित

केलेलें असलें तरी जो ह्या राजवैभवाचा द्वेष ( तिटकारा ) करीत आहे, ज्याची दृष्टि शून्यांत लागली आहे, आणि ज्यानें विविध उपभोगांचा केव्हांच त्याग केला आहे असा हत्ती, आपली प्रेयसी एकटीच अरण्यांत टाकली गेल्याच्या जाणिवेनें ( प्रियाविरहामुळें ) दुःखाच्या उष्णतेनें सुकून जात आहे.

तुरगलक्षणपरिचयो यथा मम अमृततरङ्गनाम्नि काव्ये—

**आवर्तशोभी पृथुसत्त्वराशिः फेनावदातः पवनोरुवेगः**
**गंभीरघोषोऽद्रिविमर्दखेदादश्वाकृतिं कर्तुमिवोद्यतोऽब्धिः।**
**उच्चैःश्रवाः शक्रमुपाजगाम स विश्वसाम्राज्यजयप्रदोऽश्वः**
**जग्राह हेलाघनशङ्खशब्दनिवेदिताशेषशुभं तमिन्द्रः॥**

**भावार्थ**—अश्वशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या अमृततरंग नामक काव्यांतील ह्या श्लोकांत आढळेल—

मानेवरील कुरळ्या केंसांमुळें शोभून दिसणारा; प्रचंड धैर्याची जणूं राशि असलेला; फेंसासारखा शुभ्र; वाऱ्याचा वेग असलेला; पर्वतांच्या विनाशामुळें दुःखी झाल्यामुळें अश्वाकार धारण करण्यास उद्युक्त असलेल्या, लाटांमुळें शोभणाऱ्या, प्रचंड प्राण्यांना सामावून घेणाऱ्या शुभ्र फेंसाच्या, वाऱ्याप्रमाणें वेगशाली व गंभीर आवाज करणाऱ्या सागराप्रमाणें प्रचंड आवाज करणारा; विश्वसाम्राज्याचा विजय प्राप्त करून देणारा उच्चैःश्रवस् नामक अश्व इन्द्राकडे आला. ज्याचें शुभचरित्र अत्यानंदाने फुंकल्या गेलेल्या शंखांच्या आवाजानें जाहीर झालें होतें त्या ( अश्वा ) चा इंद्रानें स्वीकार केला.

पुरुषलक्षणपरिचयो यथा कालिदासस्य— [ रघुवंश १/१३ ]

**व्यूढोरस्को वृषस्कन्धः शालप्रांशुर्महाभुजः।**
**आत्मकर्मक्षमं देहं क्षात्रो धर्म इवाश्रितः॥**

**भावार्थ**—पुरुषांच्या वैशिष्ट्यांचें ज्ञान, उदाहरणार्थ, कालिदासाच्या ह्या श्लोकांत दिसेल.

त्याची छाती रुंद होती, खांदे बैलाप्रमाणें पुष्ट होते. तो शालवृक्षाप्रमाणें उंच असून त्याचे हात लांब होते. त्याच्या रूपानें क्षात्रधर्मच स्वकर्तव्यानुरूप देह धारण करून प्रकट झाल्यासारखा भासत होता. ( तो म्हणजे जणूं मूर्तिमंत पराक्रम. )

द्यूतपरिचयो यथा चन्द्रकस्य—

**यत्रानेके क्वचिदपि गृहे तत्र तिष्ठत्यथैको**
**यत्राप्येकस्तदनु बहवस्तत्र नैकोऽपि चान्ते ।**
**इत्थं नेयौ रजनिदिवसौ तोलयन्द्वाविवाक्षौ**
**कालः काल्या सह बहुकलः क्रीडति प्राणिसारैः ॥**

**भावार्थ**—जुगाराचें ज्ञान, उदाहरणार्थ, चन्द्रकाच्या ह्या श्लोकांत आढळेल—

ज्या घरांत ( पूर्वीं ) अनेक माणसें होतीं तेथें आतां एकच दिसतो. जेथें पूर्वीं एखादाच होता तेथें आतां अनेक दिसतात; आणि शेवटीं एकदेखील शिल्लक राहात नाहीं. अशा प्रकारें द्यूतांतील दोन फांशांप्रमाणें असलेल्या दिवस व रात्र ह्यांना हातांत खुळखुळवीत अनेक कलांनी युक्त असा काल कालीसह, द्यूतांतील फांशांशीं खेळावें त्याप्रमाणें, मनुष्यप्राण्यांशीं खेळतो.

इन्द्रजालपरिचयो यथा श्रीहर्षस्य— [ रत्नावली ४-११ ]

**एष ब्रह्मा सरोजे रजनिकरकलाशेखरः शंकरोऽयं**
**दोर्भिर्दैत्यान्तकोऽसौ सधनुरसिगदाचक्रचिन्हैश्चतुर्भिः ।**
**एषोऽप्यैरावणस्थस्त्रिदशपतिरमी देवि देवास्तथान्ये**
**नृत्यन्ति व्योम्नि चैताश्चलचरणरणन्नूपुरा दिव्यनार्यः ॥**

**भावार्थ**—जादूगाराच्या कौशल्याचें ज्ञान, उदाहरणार्थ, श्रीहर्षाच्या ह्या श्लोकांत आढळेल—

महाराणी ! आकाशांत, कमळावर हा ब्रह्मदेव; हा चंद्रकोरीचा शिरोऽलंकार असलेला शंकर; इकडे तो चार हातांत अनुक्रमें धनुष्य, तरवार, गदा व चक्र हीं चिन्हें असणारा दैत्यांचा संहारक (म्हणजे विष्णु); ऐरावण ह्या हत्तीवर बसलेला देवांचा राजा ( इंद्र ) सुद्धां; तसेंच ते

दुसरे देव आणि ज्यांच्या चंचल पायांतील पैंजण छुम्छुम् करीत आहेत अशा ह्या दिव्यस्त्रिया ( अप्सरा ) नाचत आहेत.

प्रकीर्णे चित्रपरिच्चयो यथा भगवतो व्यासस्य—

**अतथ्यान्यपि तथ्यानि दर्शयन्ति विचक्षणाः ।**
**समे निम्नोन्नतानीव चित्रकर्मविदो जनाः ॥**

**भावार्थ**—संकीर्ण शास्त्रीय विषयांपैकीं चित्रकला ह्या विषयाचें ज्ञान, उदाहरणार्थ, महर्षि व्यासांच्या ह्या श्लोकांत दिसेल—

चित्रें काढण्यांत कुशल असलेले पुरुष सपाट फलकांवर उंच व सखल भाग दाखवतात. तद्वत् विचक्षण ( बुद्धिमान् ) पुरुष खोटें खरें आहे असें दाखवूं शकतात.

देशपरिच्चयो यथा मम शशिवंशे—

**भोजैः भंजनभीरुभिः विलुलितं व्यामीलितं मालवै-**
**मद्रैर्विद्रुतं एव यातं असकृन्मार्गादधो मागधैः ।**
**वंगानां अभिमन्युकंकणरवैः त्राते पुरः सूचिते**
**मीनैः संकुचितं परस्परधृतैर्नीरन्ध्रमन्ध्रैः स्थितम् ॥**

**भावार्थ**—देशज्ञानाचें वर्णन, उदाहरणार्थ, माझ्या शशिवंशांतील ह्या श्लोकांत आहे.

अभिमन्यूच्या हातांतील पोच्यांचा आवाज कानीं पडतांच पराभवाला घाबरलेल्या भोजांनीं पळ काढला, माळव्यांतील शूरांनीं ( शब्दशः मालवांनीं ) तोंड काळें केलें, मद्रांनीं धूमच ठोकली, मागधांनीं रणांगणावरून अनेकदा माघार घेतली, वंगांनीं पावलें मागें वळविलीं, मीनांनीं युध्दांतून अंग काढून घेतलें आणि आंध्र परस्परांना बिलगून एकत्र राहिले.

वृक्षपरिच्चयो यथा मम कनकजानक्याम्—

**जम्बूबिम्बकदम्बनिम्बबकुलप्लक्षाक्षभल्लातक-**
**द्राक्षाकिंशुककर्णिकारकदलीजम्बीरकोदुम्बरैः ।**

**सा सन्तानकबिल्वतिल्वतिलकश्लेष्मातकाऽऽरग्वध**
**न्यग्रोधार्जुनशातनासनवनश्यामान् ददर्शाश्रमान् ॥**

**भावार्थ**—वनस्पतिशास्त्राचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या कनकजानकींतील ह्या श्लोकांत दिसेल—

जांभूळ, बिम्ब ( एक प्रकारचें फळ ), कदम्ब, लिंबू, बकुळ, पिंपळ, अक्ष, भल्लातक, (बिब्बा), द्राक्ष, पळस, पांगारा, केळ, जम्बीरक, औदुंबर सन्तानक, बेल, तिल्व, तीळ, श्लेष्मातक, आरग्वध, वड, सादडा, शातन, आसन ह्या वृक्षांच्या वनामुळें सावळे झालेले आश्रम तिनें पहिले.

वनेचरपरिचयो यथा मम तत्रैव—

**वामस्कन्धनिषण्णशार्ङ्गकुटिलप्रान्तार्पिताधोमुख-**
**स्यन्दच्छोणितलम्बमानशशकान्पाणिस्खलच्चामरान् ।**
**ज्यान्तप्रोतकपोतपोतनिपतद्रक्ताक्ततूणीरका-**
**न्साऽपश्यत्करिकुंभभेदजनिताक्रंदान् पुलिन्दान् पुरः ॥**

**भावार्थ**—अरण्यवासी व्यक्तींचा परिचय, उदाहरणार्थ, माझ्या त्याच ( म्हणजे कनकजानकी ह्याच ) काव्यांतील ह्या श्लोकांत होईल—

ज्यांच्या डाव्या खांद्यावर टेकलेल्या वक्राकार धनुष्याच्या टोंकावर अधोमुख स्थितींत ठेवलेल्या सशांच्या शरीरांतून रक्त ठिपकत होतें, ज्यांच्या हातामधून चामर ( जातीचीं हरणें ) निसटून जाऊं पाहात होतीं, ज्यांचे भाते, धनुष्याच्या दुसऱ्या टोंकावर लोंबकळत असलेल्या कबुतरांच्या पिलांच्या शरीरांमधून ठिबकणाऱ्या रक्तानें माखले होते आणि हत्तींचीं गंडस्थळें भेदलीं गेल्यामुळें जे आरडाओरड करीत होते अशा वनेचरांना तिनें पाहिलें.

औदार्यपरिचयो यथा मम चतुर्वर्गसंग्रहे—

**मान्यः कुलीनः कुलजात्कलावान् विद्वान् कलाज्ञाद्विदुषः सुशीलः ।**
**धनी सुशीलाद्धनिनोऽपि दाता दातुर्जिता कीर्तिरयाचकेन ॥**

**भावार्थ**—औदार्याचा परिचय, उदाहरणार्थ, माझ्या चतुर्वर्गसंग्रहांतील ह्या श्लोकावरून होईल.

कुलीन व्यक्तीचा मानसन्मान करावा, कुलीनापेक्षां अधिक आदरणीय कलावंत. कलावंताहून अधिक सन्मानार्ह विद्वान्. विद्वानाहून अधिक पूजनीय सच्छील पुरुष. सच्चरित्रापेक्षां अधिक पूजार्ह धनसंपन्न. त्याहूनहि सन्माननीय दाता. पण जो कधींच याचना करीत नाहीं तो दात्याच्याहि कीर्तीवर मात करतो. ( तो दात्यापेक्षांहि अधिक सन्मानार्ह, अधिक कीर्तिशाली.)

अचेतनचेतनाध्यारोपपरिचयो यथा मच्छिष्यमहाश्रीभट्टोदयसिंहस्य ललिताभिधाने महाकाव्ये—

**इह विकसदशोकास्तोकपुष्पोपहारै-**
**रयमतिशयरक्तः सक्तसुस्निग्धभावः ।**
**त्रिभुवनजयसज्जः प्राज्यसाम्राज्यभाजः**
**प्रथयति पृथुमैत्रीं पुष्पचापस्य चैत्रः ॥**

**भावार्थ**—अचेतनावर चेतनाचा आरोप कसा करावा त्याचा परिचय, उदाहरणार्थ, माझा शिष्य भट्टोदयसिंह ह्याच्या ललित नामक महाकाव्यांतील ह्या श्लोकांत होईल.

प्रेमामुळें अत्यंत लाल झालेला, मनांत दृढ स्नेहभाव बाळगणारा व तिन्ही लोकांना जिकण्यास सज्ज असलेला हा वसंतमास, विकसणाऱ्या अशोकाच्या फुलांच्या अनेक गुच्छांचा नजराणा विस्तीर्ण साम्राज्याचा उपभोग घेणाऱ्या मदनाला देऊन, आपली गाढ मैत्री प्रदर्शित करीत आहे.

भक्तिपरिचयो यथाऽस्यैव भक्तिभवनाम्नि महाकाव्ये—

**बाल्यादेव निरर्गलप्रणयिनी भक्तिर्भवानीपतौ**
**जन्मायासविकासवासितमनःसंवाससंदायिनी ।**
**प्रायः प्राक्तनकर्मनिर्मितमहामोहप्ररोहापहा**
**भव्यानां भवभीतिभंजनसखी सञ्जायते सन्मतिः ॥**

**भावार्थ**—भक्तीचा परिचय, उदाहरणार्थ, ह्याच्याच (म्हणजे भट्टोदयसिंहाच्याच) भक्तिभव नामक महाकाव्यांतील पुढील श्लोकावरून होईल.

जन्माचे कष्ट व जन्मोत्तर जीवनाचा विकास ह्यांनीं सुसंस्कृत झालेल्या मनांत शंकराविषयींच्या अनिर्बंध व उत्कट भक्तिभावाला बालपणापासूनच जोपासणारी ( शब्दशः वास्तव्यास अवसर देणारी ), प्रायः पूर्वजन्मींच्या कर्मांपासून उत्पन्न होणाऱ्या महामोहरूप अंकुराचा नाश करणारी आणि संसाराच्या भीतीचा उच्छेद करण्यांत साह्य करणारी सद्बुद्धि भाग्यशाली व्यक्तींना लाभते.

विवेकपरिचयो यथा मच्छिष्यराजपुत्रलक्ष्मणादित्यस्य —

**आशापाशविमुक्तियुक्तममलं सन्तोषमान्यं मनः**
**सेवायासविवर्जितं विहरणं मायाविहीनं वचः ।**
**चण्डीशार्चनमात्मशुद्धिजननी गङ्गेव सत्सङ्गतिः**
**सोऽयं सन्तरणे परः परिकरः संसारवारां निधेः ॥**

**भावार्थ**—विवेकाचा परिचय, उदाहरणार्थ, माझा शिष्य राजपुत्र लक्ष्मणादित्य, ह्याच्या पुढील श्लोकावरून होईल—

( कोणत्याहि परिस्थितींत ) संतोष मानणारें, आशापाशांपासून पूर्णपणें मुक्त, व निर्मळ असें मन, ( इतरांची ) सेवा करण्याच्या परिश्रमांपासून रहित असें आचरण, निष्कपटी बोलणें, शंकराची पूजा-अर्चा, गंगेप्रमाणें आत्मशुद्धि साधणारी सत्संगति—ह्या सर्वांचा समुदायच संसाररूपी जलांचा निधि ( म्हणजे संसारसागर ) तरून जाण्याची जणूं नौका होय.

प्रशमपरिचयो यथा मम चतुर्वर्गसंग्रहे—

**चित्तं वातविकासिपांसुसचिवं रूपं दिनान्तातपं**
**भोगं दुर्गतगेहबन्धचपलं पुष्पस्मितं यौवनम् ।**
**स्वप्नं बन्धुसमागमं तनुमपि प्रस्थानपुण्यप्रपां**
**नित्यं चिन्तयतां भवन्ति न सतां भूयो भवग्रन्थयः ॥**

**भावार्थ**—यतिवृत्तीचें ज्ञान, उदाहरणार्थ, माझ्या चतुर्वर्गसंग्रहांतील ह्या श्लोकांत आढळेल—

मन म्हणजे वाऱ्यानें वाहविलेल्या धूलिकणांचा मित्र, सौन्दर्य म्हणजे

दिवसाच्या अखेरीस मावळणारा सूर्य, सुखोपभोग म्हणजे मोडकळीस आलेल्या घराचे खिळखिळे झालेले सांधे, यौवन म्हणजे फुलाचें उमलणें, नातलगांची भेट म्हणजे स्वप्न, आणि शरीर म्हणजेदेखील येणाऱ्याजाणाऱ्यां-साठीं घातलेली पुण्यप्रद पाणपोई–असें नित्य चिन्तन करणाऱ्या सज्जनांना ह्या संसारग्रंथी पुनःपुन्हां बंधनांत टाकीत नाहींत. ( म्हणजे त्यांची जन्ममृत्यूंच्या फेऱ्यांतून कायमची मुक्तता होते. )

**इत्युक्ता रुचिरोचिता परिचयप्राप्तिर्विभागैर्गिरां**
**दिङ्मात्रेण विचित्रवस्तुरचनामैत्रीपवित्रीकृता ।**
**यद्यस्त्यत्र नवोपदेशविषये लेशेऽप्युपादेयता**
**तत्सद्भिर्गुणकौतुकादवसरः श्रोतुं समाधीयताम् ॥ २ ॥**

**भावार्थ**—अशाप्रकारें वेगवेगळ्या शास्त्रांशीं सुंदर व अनुरूप परिचय कसा प्राप्त करून घ्यावा तें वाणीच्या विस्ताराच्या विभागांच्या साह्यानें ( तर्क, व्याकरण इत्यादि वाग्विस्ताराचे विभाग होत ) निरू-पिलें. ह्या केवळ सूचना होत. हें निरूपण सुंदर रचनांच्या ( नाना विषयांवरील सुंदर श्लोकांच्या ) मदतीमुळें पवित्र झालें आहे. उपदेशार्थ हातीं घेतलेल्या ह्या नवीन विषयांत सज्जनांना यत्किंचित् कां होईना ग्राह्यता आढळली तर त्यांनीं गुणांविषयींच्या कुतूहलामुळें हें ( निरूपण ) ऐकण्यास थोडी फुरसत काढावी.

**कृत्वा निश्चलदैवपौरुषमयोपायं प्रसूत्यै गिरां**
**क्षेमेन्द्रेण यदर्जितं शुभफलं तेनास्तु काव्यार्थिनाम् ।**
**निर्विघ्नप्रतिभाप्रभावसुभगा वाणी प्रमाणीकृता**
**सद्भिर्वाग्भवमन्त्रपूतविततश्रोत्रामृतस्यन्दिनी ॥ ३ ॥**

**भावार्थ**—काव्यनिर्मितीसाठीं दैवी व मानवी अशा उभयविध उपायांचा निर्धारानें अवलंब करून क्षेमेन्द्रानें जें शुभ फल मिळविलें आहे तें काव्य निर्मूं इच्छिणारांस लाभो. निर्विघ्न अशा प्रतिभेच्या प्रभावा-मुळें सौंदर्यपूर्ण बनलेली आणि वाग्भवबीजमंत्रोच्चारणानें परमपुनीत झालेल्या

[illegible]ताची दृष्टि करणारी त्यांची (का[illegible]) वाणी सज्जनां-कडून प्रमाण मानली जावो.

इति श्रीव्यासदासाख्यापराख्यक्षेमेन्द्रकृते कविकण्ठाभरणे
परिचयप्राप्तिः पंचमः सन्धिः ।

अशा प्रकारें, व्यासदास हें दुसरें नांव धारण करणाऱ्या क्षेमेन्द्रानें लिहिलेल्या कविकंठाभरण नामक ग्रंथांतील परिचयप्राप्ति हा पांचवा सन्धि समाप्त झाला.

**काश्मीरेषु पृथुप्रतापसवितुः कीर्त्यंशुतारापतेः**
**प्रौढारातिवनानलस्य धनदस्येन्द्रस्य [illegible]ले ।**
**विश्वाकारवतः पुनः कलियुगे विष्णोरिवोत्साहिनो**
**राज्ये श्रीमदनन्तराजनृपतेः काव्योदयोऽयं कृतः ॥**

**इति कविकण्ठाभरणं समाप्तम् ।**

**भावार्थ**—प्रचंड पराक्रमाचा सूर्य, कीर्तिरूपी किरण असलेला चन्द्र, बलशाली शत्रूंच्या संघाला दग्ध करणारा अग्नि, पृथ्वीवरील कुबेर, पृथ्वीवरील इन्द्र, कलियुगांत पुनः प्रकट झालेला [illegible]आकारयुक्त विष्णूप्रमाणें साहसी, असा अनन्तराज नामक राजा काश्मीरांत राज्य करीत असतांना हें काव्य सिद्ध केलें.

अशा प्रकारें कविकंठाभरण समाप्त झालें.

**संक्षिप्त-विवरण**—सुकवीनें परिश्रमपूर्वक शास्त्रीय ज्ञान मिळवावें ही क्षेमेन्द्राची भूमिका भामह, दण्डी, वामन, आनंदवर्धन ह्यांच्या भूमिकेसारखीच आहे. खुद्द क्षेमेन्द्रानें तर्कादि अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें असावें असें वाटतें. शेवटच्या दोन श्लोकांवरून त्याची नम्रता तसेंच उदारता दिसून येते. त्यानें भरत, चाणक्य व वात्स्यायन ह्या तीन व्यक्ति-नामांचा त्या व्यक्तींनीं लिहिलेल्या ग्रंथांच्या द्योतनार्थ केलेला उल्लेख विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे.

# परिशिष्ट 'अ'

## ग्र[illegible]रिकांची अकारानुक्रमणिका


| कारिकारंभ | संदर्भ | पृष्ठांक | कारिकारंभ | संदर्भ | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| ॐ स्वस्त्यङ्क[illegible] | १–६ | २५ | नहि परिचय | ५–१ | ६२ |
| अतृष्णता निजोत्कर्षे | २–१३ | ४० | नाटकाभिनयप्रेक्षा | २–५ | ३८ |
| अभ्यासहेतोः | १–२१ | ३० | निर्विकारां | १–१३ | २७ |
| अयाचकत्वं | २–१८ | ४१ | निशाशेषे | २–९ | ३९ |
| अविकत्थनतादैन्यं | २–२० | ४२ | नूतनोत्पादने | २–१९ | ४१ |
| आधानोद्धरण | २–१२ | ४० | पठेत्समस्तान् | १–१९ | २९ |
| आलोकः पत्रलेख्यादौ | २–१० | ३९ | परं फलप्रदं | १–९ | २६ |
| इति गदि[illegible] | ४–२ | ६० | पश्चात्परिचयः | १–४ | २४ |
| इति तत[illegible]नां | १–२४ | ३१ | पाठस्य अवसर | २–१५ | ४० |
| इति बहुतरशिक्षा | २–२३ | ४२ | प्रारब्धकाव्य | २–२२ | ४२ |
| इत्युक्तः ए[illegible]ः | ३–३ | ५२ | महाकवेः | १–२० | २९ |
| इत्युक्ता रुचिरोचिता | ५–२ | ७६ | यस्तु प्रकृत्या | १–२२ | ३१ |
| उपदेशवि[illegible]क्तिः | २–१६ | ४१ | रवीन्दुतारका | २–११ | ३९ |
| एकं ऐश्वर्य | १–७ | २६ | रसे रसे | १–१८ | २९ |
| एकेन के[illegible] | ३–२ | ४५ | लोकाचार | २–६ | ३८ |
| एतां नमः | १–१० | २६ | विज्ञातशब्दागम | १–१६ | २८ |
| काव्यक्रियेच्छा | १–१४ | २७ | वृत्तपूरणं | २–३ | ३८ |
| काव्यैकपात्र | ४–१ | ५४ | वैदग्ध्यं पटुता | २–१७ | ४१ |
| कुर्वीत साहित्यविदः | १–१५ | २८ | व्रतं सारस्वतः | २–२ | ३७ |
| कृत्वा निश्चल | ५–३ | ७६ | व्रतिनां पर्युपासा | २–८ | ३९ |
| गीतेषु गाथास्वथ | १–१७ | २९ | शिल्पिनां कौशल | २–७ | ३९ |
| चन्द्रोच्छलज्जलं | १–८ | २६ | शिष्याणां | १–२ | २४ |
| छायोपजीवी | २–१ | ३३ | श्वेतां सरस्वतीं | १–११ | २७ |
| जयति | १–१ | [illegible] | सदा स्वकाव्य | २–१४ | ४० |
| तत्राकवेः | १–३ | [illegible] | सप्रसादपदन्यासः | २–२१ | ४२ |
| त्रिकोणयुगमध्ये | १–१२ | २७ | सहवासः | [illegible] | [illegible] |
| न तस्य | १–२४ | ३१ | सुकविः | [illegible] | [illegible] |
| | | | सुविभक्तिसमन्वित | १–५ | २५ |